काबरा एक्सप्रेस
डेली A/C बस / अर्जंट पार्सल सर्विस • फुल लोड / पार्ट लोड सर्विस उपलब्ध
गुजरात अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद,नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश इंदौर, (राज महौल्ला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र मुंबई, (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक, पुणे
राजस्थान उदयपुर, अजमेर, जयपुर दिल्ली मोरी गेट
साऊथ बंगलोर, हैदराबाद, गोवा
अहमदनगर नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड 7972872112
EYE Q MEDIA



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




गर्मी में भी सर्दी का मजा
COMPRO Systems & Services
Symphony DAIKIN BLUE STAR VOLTAS Carrier
कुलर, ए.सी., फ्रीज
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
HDB BAJAJ FINSERV
• वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २९.०१.२०२५ | अंक नं. २७८ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# मनोज जरांगे पाटलांच्या उपोषणाकडे राज्य सरकारचे 'जाणीवपूर्वक दुर्लक्ष'

## नगरमधील अखंड मराठा समाज आक्रमक, दिला गंभीर इशारा

नगर – संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्यासह मराठा बांधव गेल्या ५ दिवसांपासून जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे उपोषणास बसले आहेत. त्यांच्या उपोषणाकडे राज्य सरकारचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असून या ठिकाणी काही अनुचित प्रकार घडला तर त्यास सर्वस्वी सरकार जबाबदार असेल असा इशारा नगर मधील अखंड मराठा समाजाच्या वतीने देण्यात आला आहे. समाजाच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांची भेट घेवून याबाबतचे निवेदन दिले आहे.


मनोज जरांगे यांच्या उपोषणाकडे सरकारचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना निवेदन देताना नगरमधील अखंड मराठा समाजाचे शिष्टमंडळ.

या निवेदनात त्यांनी म्हंटले आहे की, संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्यासह इतर मराठा सेवक हे २५ जानेवारी पासून मराठा समाजाला आरक्षण मिळावे व मराठा समाजाच्या अन्य काही मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे सामुहिक आमरण उपोषणास बसलेले आहेत. उपोषणाचा आजचा पाचवा दिवस असून उपोषणकर्त्यांची प्रकृती चिंताजनक होत चाललेली आहे. सरकार जाणीवपूर्वक या उपोषणाकडे दुर्लक्ष करत आहे. अद्यापपर्यंत सरकारच्यावतीने कोणीही मनोज जरांगे यांच्याशी चर्चेसाठी गेलेले नाही.

आम्ही या निवदेनाद्वार सूचित करतो की समाजाच्या संयमाचा बांध सुटत चाललेला आहे. तेंव्हा आपण या निवेदनाची गांभीर्याने दखल घेवून सरकार व शासनाच्यावतीने शिष्टमंडळ अथवा प्रतिनिधी पाठवून चर्चा करून मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य कराव्यात अन्यथा काही अनुचित प्रकार घडल्यास किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ही सरकारची असेल. असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

यावेळी मदन आढाव, गजेंद्र दांगट, राम जरांगे, प्रमोद कोरडे, सखाराम गुंजाळ, संदीप जगताप, मिलींद जपे, मनोज सोनवणे, दिलीप कोल्हे, अशोक गाढे, अभय शेंडगे, परमेश्वर पाटील, विलास तळेकर, किशोर शिंदे, गिरीश भांबरे, अमोल पवार, राम सातपुते, स्वप्निल दगडे, गोरक्षनाथ पठारे, भाऊ दिघे, सुरज वाबळे आदींसह समाज बांधव उपस्थित होते.

# तोडगा निघेपर्यंत मनपाने शहरातील गाळेधारकांवरील कारवाई थांबवावी

## खासदार निलेश लंके यांचे महापालिका प्रशासनाला आदेश

नगर – शहरातील महापालिकेच्या गाळेधारकांचा रेडीरेकनर दराने गाळे भाडे देण्यास विरोध असून यासंदर्भात शासनाकडे मार्गदर्शन मागवावे तोपर्यंत गाळेधारकांकडून ५० टक्के रक्कम जमा करून घेऊन त्यांच्यावर सुरू केलेली कारवाई थांबवावी, असे आदेश खा. निलेश लंके यांनी महापालिका प्रशासनाला दिले आहे.

खासदार लंके यांनी २९ जानेवारीला दुपारी महापालिका कार्यालयात विविध विषयांवर आढावा बैठक घेतली. या बैठकीत महापालिकेच्या गाळेधारकांचा प्रश्न उपस्थित झाला असता खा. लंके यांनी गाळेधारकांवर सुरू असलेली जप्तीची कारवाई थांबविण्याचे आदेश दिले. गाळेधारकांचा रेडीरेकनरनुसार भाडे देण्यास विरोध असल्याने याबाबत शासनाकडून मार्गदर्शन


(वृत्त व छायाचित्र पान २ वर)


### प्रधान सचिवांना केला फोन

महापालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार सेवेत घेण्याचा प्रश्न गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. याबाबत खा. लंके यांनी आयुक्त यशवंत डांगे यांना विचारणा केली. त्यावेळी डांगे यांनी यासंदर्भात राज्य शासनाच्या नगरविकास विभागाशी पत्रव्यवहार सुरू असल्याचे सांगितले. यावेळी खा. लंके यांनी थेट राज्याच्या प्रधान सचिवांना फोन करून सदर प्रश्न येत्या दोन-तीन दिवसात मार्गी लावण्याच्या सूचना केल्या.

### ...तर डान्सबारला परवानगी द्या

महापालिकेच्या गाळेधारकांच्या प्रश्नावर चर्चा सुरू असताना माजी नगरसेवक दीप चव्हाण यांनी महापालिकेने अमरधाममध्ये गाळे बांधून तेथे दारूविक्रीच्या दुकानांना परवानगी दिली असल्याचे निदर्शनास आणून दिले. ज्या गाळेधारकांचे व्यवसाय चालत नाहीत, अनेक गाळे बंद आहेत अशा गाळेधारकांवर महापालिका कारवाई करते तर दुसरीकडे अमरधामसारख्या ठिकाणी दारूविक्रीसाठी गाळे बांधून देते ही बाब शहरासाठी भूषणावह नाही. अमरधाममध्ये जर दारूविक्रीसाठी गाळे उपलब्ध करून देणार असाल तर मलाही त्या ठिकाणी डान्सबार सुरू करण्यास परवानगी द्या, असा उपरोधिक टोलाही दीप चव्हाण यांनी महापालिका प्रशासनाला मारला.

यावेळी माजी महापौर अभिषेक कळमकर, राजेंद्र दळवी, संजय शेंडगे, योगिराज गाडे, प्रदीप परदेशी, रेवजी नांगरे आदी उपस्थित होते.


"चेअरमन" प्रयत्न केले फार... कित्येकदा आलेला घास सोडला,
पण जिद्द नाही सोडली, दोघा भावांनी केले स्वप्न साकार,
प्रयत्नांना मिळाले शब्दांचे आकार...

चेअरमन साहेब
श्री.समीर अरुण बोरा
सहकारमहर्षी श्री सुवालालजी गुंदेचा
जैन ओसवाल नागरी सह. पतसंस्था मर्या. च्या
चेअरमनपदी व व्हा. चेअरमनपदी
श्री. अभय पितळे

यांची निवड झाल्याबद्दल
मनःपूर्वक अभिनंदन

हिरालाल बन्सीलालजी गुगळे
LIC एजंट
अहिल्यानगर

अभय शांतीलालजी मुथा
गर्व्हमेंट कॉन्ट्रॅक्टर
Er. गौरव अभय मुथा
इंजिनियर आणि कॉन्ट्रॅक्टर

डॉ. अनिल रणनवरे
आशाकिरण क्लिनीक
तारकपूर, अहिल्यानगर

संजय बन्सीलालजी बोरा
रुतिक संजय बोरा
बोरा फर्निचर
अहिल्यानगर

Er. अभय कनकमलजी चंगेडिया
(पुणे)
Er. अतुल कनकमलजी चंगेडिया
(पुणे)
रोनक अतुल चंगेडिया

वैभव हिरालालजी गुगळे
LIC एजंट, अहिल्यानगर
आनंद हिरालालजी गुगळे
मिहीर/धनिष्का/साची

साहिल समीर बोरा
सार्थक सागर बोरा
ओम कलेक्शन
मोचीगल्ली, अहिल्यानगर

लतिका कलेक्शन
नाईट गाऊन, लेडिज होजिअरी
कुष्टधामरोड (सावेडी)
अहिल्यानगर
मो. ९८२२२६६९०१

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## कामाचे तास - क्वॉलिटी की क्वांटीटी?

काही वर्षापूर्वी इन्फोसिसचे मुख्य श्री. नारायण मूर्ती यांनी कामाचे तास ७० तास असावे असे सुचवले होते. अर्थातच यावर सल्ला, मार्गदर्शन व चर्चांचे गुऱ्हाळ चालले होते. नुकतेच एल ॲण्ड टी चे अध्यक्ष सुब्रम्यणन यांनी ९० तास काम करण्याचा मुद्दा मांडला. अर्थातच पुन्हा यावर गदारोळ माजणे स्वाभाविक!

खरं तर या मुद्यावर मालक-नोकर, कंपन्यांचे व्यवस्थापन - कर्मचारी यामध्ये एकवाक्यता होणे केवळ अशक्यच असेल. यांच्यात सौहार्दपूर्ण संबंध व सुसंवाद असेल तरच कामाचे तास, पगार, संस्थेची प्रगती योग्य मार्गावर चालेल.

कर्मचाऱ्यांच्या परिपूर्ण योगदानाशिवाय त्या त्या कंपनी, बँक, संस्थांची धोरणे कदापि यशस्वी होऊ शकत नाही. दैनंदिन कार्ये, कौटुंबिक जबाबदाऱ्या, शरीरासाठी आवश्यक असणारी विश्रांती या सर्वांचा विचार करता साधारणतः दररोज ८ तासांचा

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



कार्य समय योग्य असल्याचे जगभरात मान्य करण्यात आले आहेत.

खरं तर सामान्यतः मालकांना किमान पगारात सर्वाधिक काम करणारी तर सर्वाधिक पगारात किमान काम करणारे कर्मचारी असतात म्हणजे कर्मचाऱ्यांना तसं वाटतंय. विशेषतः शासकीय, निमशासकीय, शिक्षकवर्ग यामध्ये कोण किती काम करतंय, त्यांना दायित्व किती यावर वादविवाद असू शकतात. दोन्ही बाजूकडून (मालक-कर्मचारी) प्रामाणिकता, नैतिकता असेल तरच उज्वल भवितव्य असू शकते. तात्पर्य, कामाच्या तासांबाबत क्वॉलिटी की क्वांटीटी हा ज्याच्या त्या प्रामाणिकतेचा व कळीचा मुद्दा होता व राहील. म्हणजेच ८ तासात ४ तासांचे काम करायचे की ४ तासातच गुणात्मक, फलदायी असे ८ तासाचे काम करायचे?

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

नगर - जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये ६ फेब्रुवारी रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. सदरचे आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणुका, किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल.

## अजित एकाडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - माळीवाडा शिंदे गल्ली येथील अजित अर्जुनराव एकाडे (वय ४७) यांचे २९ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, आई, बहीण, २ भाऊ, भावजया, २ मुले असा परिवार आहे. ते धीरज, बबलू एकाडे यांचे लहान बंधू होत.

## संदीप जाधव यांचे दु:खद निधन



नगर - भिंगार गवळीवाडा येथील संदीप सुभाष जाधव (वय ३९) यांचे २८ जानेवारी रोजी निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे आई, भाऊ, पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. भिंगार येथील सम्राट मेन्स पार्लरचे ते संचालक होते.


## निर्मलाताई धुपधरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - वंजारगल्ली, रायगड चौक, अहिल्यानगर येथील रहिवासी निर्मलाताई (काकु) अरुण धुपधरे (वय ६५) यांचे २७ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर काटवन खंडोबा रोड लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती अरुण, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. त्या शिवसेना महिला आघाडीच्या प्रथम जिल्हा प्रमुख होत्या.

## सेवानिवृत्त सनदी अधिकारी श्रीकृष्ण वनपाल यांचे निधन



नगर - येथील सेवानिवृत्त सनदी अधिकारी श्रीकृष्ण केशव वनपाल (वय ८४) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे अमेरिकेत राहत असलेला मुलगा प्रसाद, विवाहित मुलगी सौ. स्मिता घैसास, नातवंडे असा परिवार आहे.

अहमदनगर शहर सहकारी बँकेचे चेअरमन गिरीश घैसास हे जावई आहेत. त्यांनी मरणोत्तर देहदान केले


## भागीरथी जगधने यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - येथील भागीरथी म्हसुजी जगधने (वय ८४) यांचे पुणे येथे हृदयविकाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सतीश जगधने व राजेंद्र जगधने यांच्या मातोश्री होत.

## माणिकराव पवार गुरुजी यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक व ज्येष्ठ स्वाध्यायी माणिकराव विठ्ठलराव पवार गुरुजी (वय ९२) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, एक मुलगा, दोन मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे तालुका विकास अधिकारी शिवाजी पवार यांचे वडील, विजयराव पवार यांचे बंधू, आयकॉन कॉम्प्युटरचे मालक विशाल पवार, विनायक पवार व मनोज पवार यांचे चुलते, शुभम पवार व सौरभ पवार यांचे आजोबा होत.

## लक्ष्मण सोनवणे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - नेवासा तालुक्यातील जळके खुर्द येथील सोनवणे वस्तीवरील बांधकाम व्यावसायिक लक्ष्मण दौलत सोनवणे (वय ७०) यांचे २२ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. सोनवणे वस्तीवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. गायक रोझमॅन सर सुनिल तेलतुंबडे यांचे ते सासरे होत. त्यांचे थोरले चिरंजीव राजू सोनवणे हे शेतकरी, मधले चिरंजीव विश्वास सोनवणे हे शिक्षक, धाकटे चिरंजीव विजय सोनवणे हे एस.टी.महामंडळात बस वाहक तर मुलगी सौ.अर्चना तेलतुंबडे यांची अन्नपूर्णा अशी ओळख आहे.

# लाडक्या बहिणींना त्रासदायक ठरणाऱ्या देशी दारूच्या 'लायसन'बाबत राज्य सरकारने भूमिका स्पष्ट करावी

नगर - राज्याची आर्थिक तूट भरून काढण्यासाठी राज्यात १९७२ पासून देशी दारूचे परवाने देणे बंद आहे ते पुन्हा देणे सुरू करावे, अशी सूचना अधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना केल्याची बातमी २५ डिसेंबर २०२४ च्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली. लाडकी बहीण योजनेत होणारी तूट भरून काढायला लाडक्या बहिणींचे संसार उद्ध्वस्त करणारी देशी दारू वाढवून पैसा उभा करण्याची अधिकाऱ्यांची ही मानसिकता अत्यंत नीच आणि संतापजनक आहे. लाडक्या बहिणींना त्रासदायक ठरणाऱ्या देशी दारूच्या 'लायसन'बाबत राज्य सरकारने भूमिका स्पष्ट करावी, असे आवाहन अशोक सब्बन यांनी केले आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिलेल्या निवेदनात सब्बन यांनी म्हटले आहे की, देशी दारूचे ग्राहक गरीब माणसे असतात. खेड्यातील कष्टकरी व शहरी झोपडपट्टीतील गरीब लोक देशी दारू पितात. त्यातून महिलांना मारहाण करणे, अत्याचार होतात, अनेक महिलांचे खूनसुद्धा होतात. अपघात आणि गुन्ह्यात आरोपी दारू पिलेले असतात हे अनेकदा सिद्ध झाले आहे. काल ढंपरने गरिबांना चिरडले, तो चालकदेखील दारू पिलेला होता.

त्यामुळेच यापूर्वीच्या सर्व प्रकारच्या सरकारांनी विदेशी दारूचे लायसन वाटले पण गरीबांचे संसार उद्ध्वस्त करणाऱ्या देशी दारुला ५२ वर्षात महाराष्ट्रात वेगवेगळ्या पक्षांची सरकारे आली, पण त्यांनी लायसन दिली नाहीत. पण आज इतकी उधळपट्टी केल्यानंतर सरकार या कारकिर्दीची सुरवात जर देशी दारू परवाने वाटून करणार असेल तर हे संतापजनक आहे.

एकीकडे लाडकी बहिण हा जप करायचा, त्यांनी सरकार आणले म्हणायचे आणि दुसरीकडे त्यांना पैसे देण्यासाठी गरीबांचे संसार उद्ध्वस्त करणारी दारू विकून पैसे आणायचे, हे अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक आहे. तेव्हा उपमुख्यमंत्री आणि उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी भूमिका स्पष्ट करून देशी दारूचे परवाने पुन्हा सुरु करणार का? हे सांगितले पाहिजे.


त्याचबरोबर या महिलांचे भाऊ देवाभाऊ व एकनाथभाऊ यांनीही भूमिका स्पष्ट केली पाहिजे.

बंगलोर येथील NIMHN या संस्थेने केलेल्या अभ्यासात स्पष्टपणे मांडले आहे की, दारुतून सरकारला जितके उत्पन्न मिळते त्यापेक्षा जास्त रक्कम ही सरकारला दारुतून निर्माण होणारे प्रश्न सोडवायला खर्च करावी लागते. दारूमुळे सरकारला आरोग्य आणि कायदा सुव्यवस्था यावर जास्त खर्च करावा लागतो. मनुष्यबळ कार्यक्षमता कमी होते. त्यातून आर्थिक नुकसान होते. अशावेळी दारुतून महसूल वाढतो, या चुकीच्या विचारातून सरकारने बाहेर आले पाहिजे.

आज गरिबांच्या अंगावर दारू पिऊन गाडी घालणारे धनदांडगे सर्वत्र दिसत असताना राज्याचे सरकार दारू विक्री वाढवावी, असा विचार कसा काय करू शकते?

असा निर्णय घेतल्यास लाडक्या बहिणींची ती सर्वात मोठी फसवणूक ठरेल, त्यामुळे सरकारने तातडीने अधिकाऱ्यांनी केलेल्या सूचनेवर भूमिका जाहीर करावी. देशी दारू लायसन व विदेशी दारू लायसन वाढणार नाहीत, हे लाडक्या बहिणींना स्पष्टपणे सांगितले पाहिजे, असे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन, जिल्हा अध्यक्ष सुधीर भद्रे, शहर अध्यक्ष रईस शेख यांनी म्हटले आहे.

## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज जन्मोत्सवानिमित्त शिलाविहारला २ फेब्रुवारीपासून भागवत कथेचे आयोजन



नगर - सावेडी उपनगरातील शिलाविहार येथे श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या मंदिरात जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहामध्ये भागवत कथा, अखंड नामजप, श्रींच्या चरित्र ग्रंथाचे पारायण व्यासपीठ चालक मनीषा भोंग करणार आहेत.

२ फेब्रुवारी पासून या सप्ताहाची सुरुवात होणार आहे. रोज पहाटे श्रींच्या मूर्तीस अभिषेक, काकडा आरती, सकाळी ९ ते ११ पारायण, दुपारी १२वाजता महाआरती होऊन महाप्रसादाचे वाटप होईल. दुपारी ३ ते ६या वेळेत भागवताचार्य नंदकुमार रामदासी (बीडकर) हे आपल्या रसाळ वाणीतून भागवत कथा सांगणार आहेत. तरी याचा भाविकांनी श्रवणाचा लाभ घ्यावा. असे आवाहन सुंदरदास रिंगणे यांनी केले आहे.

या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता ९ फेब्रुवारी रोजी होणार आहे. सकाळी ७ वाजता श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचा जन्मोत्सव साजरा होईल. सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे किर्तन होणार आहे. दुपारी १२ वाजता महाआरती होऊन महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. या सप्ताह मध्ये श्रींचे चरित्र ग्रंथ पारायण वाचनासाठी ज्या भाविकांना बसायचे आहे. त्यांनी विजय मते (९२ २५ ३२ २३ ८९) यांच्याशी संपर्क साधावा म्हणजे ग्रंथ उपलब्ध करुन देता येईल. तसेच ज्यांना अखंड नामजपास १ तास बसायचे असेल त्यांनी या सप्ताहात उपस्थित राहून नामजप करावा. त्यांना माळा उपलब्ध करून देण्यात येतील. असे सौ. रेखाताई रिंगणे यांनी सांगितले. भाविकांनी या सप्ताहाचा लाभ घ्यावा. असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. असे अशोक मुळे यांनी सांगितले.

## रुची ठाकरे यांचे सुयश : इंग्लंडच्या नामांकित विद्यापीठातून उच्च पदवी उत्तीर्ण



नगर - काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशनचे कार्यकारी विश्वस्त डॉ.सुभाष म्हस्के व डॉ.सुमती मस्के यांची नात तसेच विश्वस्त डॉ.दीप्ती आणि फाउंडेशनचे सीईओ समीर ठाकरे यांची कन्या रुची ठाकरे यांनी इंग्लंडमधील किंग्जस्टन विद्यापीठातून उच्च शिक्षण पूर्ण करत सुयश प्राप्त केले आहे.

कु.रुची यांचा नुकताच काकासाहेब म्हस्के शैक्षणिक संकुल येथे सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ.सुभाष म्हस्के, डॉ.सुमति म्हस्के, विश्वस्त डॉ.अभितेज म्हस्के, डॉ.दिप्ती ठाकरे, सीईओ समीर ठाकरे, काकासाहेब म्हस्के होमिओपॅथी मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ.विवेक रेगे, काकासाहेब म्हस्के फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ.संदीप बडधे, पार्वतीबाई म्हस्के नर्सिंग इन्स्टिट्यूटचे प्राचार्य अजित चवरदार आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ.म्हस्के म्हणाले की, रुची यांनी बी. ई. कॉम्प्युटर सायन्स नंतर लंडन येथील किंग्जस्टन विद्यापीठातून एम.एसस्सी इन युजर एक्सपिरियन्स डिझाईन ही संगणक शास्त्रातील पदवी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होत यश प्राप्त केले आहे. कै. काकासाहेब म्हस्के यांची चौथी पिढी जागतिक स्तरावर प्राविण्य मिळवत म्हस्के परिवाराचे नाव उज्वल करत असल्याचा आनंद होत असल्याचे ते म्हणाले.

# वाढत्या चोऱ्यांच्या घटनांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात

### इसळक - निंबळक ग्रामस्थांची मागणी

नगर - रात्रीची गस्त घालत असताना सावधगिरी बाळगावी. रात्री अपरात्री कामाच्या किंवा आपत्कालीन परिस्थितीत अनेकांना प्रवास करावा लागतो, गैरसमजातून अनावधानाने काही अनुचित प्रकार घडू शकतो. त्यामुळे अनोळखी इसमाची खातरजमा करावी, कोणी संशयित आढळून आल्यास पोलिसांशी संपर्क साधावा. युवक - तरुणांनी जबाबदारीने परिस्थीती हाताळल्यास चोरींच्या घटनांना आळा बसेल, असा विश्वास सपोनि. माणिक चौधरी यांनी व्यक्त केला.

डॉ. दिलीप पवार व अजय लामखडे यांनी निवेदन देऊन गावात बैठकीचे आयोजन करण्याबाबत एमआयडीसी पोलीस स्टेशनचे एपीआय चौधरी यांच्याशी चर्चा केली होती. त्यावर सकारात्मक प्रतिसाद देत २५ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता बैठक पार पडली. त्यावेळी मार्गदर्शनपर भाषणात ते बोलत होते.

इसळक परिसरात गेल्या पंधरवड्यात जबरी चोरीची घटना घडली आहे. त्यांनतर दररोज चोरी करण्याचा प्रयत्न चोरांनी केलेला असून, दररोज रात्री कुठे ना कुठे चोर दिसून येत आहेत. त्यामुळे इसळक - निंबळक मध्ये भितीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संपूर्ण दोन्ही गावातील तरुण रात्री जागरण करुन गावाचे रक्षण करत आहेत.

त्यामुळे पोलिसांनी वाढत्या चोऱ्यांचे सत्र लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात अशी मागणी इसळक - निंबळक ग्रामस्थांनी एमआयडीसी पोलीस स्टेशनचे एपीआय माणिक चौधरी यांच्याकडे केली आहे.



वाढत्या चोऱ्यांच्या घटनांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी बैठकीत करताना इसळक - निंबळकचे ग्रामस्थ.

ग्रामस्थांनी पोलीस अधिकारी चौधरी यांच्या उपस्थित दत्त मंदिरात बैठक घेतली. उपस्थित तरुण आणि ग्रामस्थांनी आपली कैफियत मांडली. पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी तसेच कुठलीही घटना घडल्यास तातडीने प्रतिसाद द्यावा, अशी मागणी केली.

बैठकीसाठी संजय गेरंगे, बी. डी. कोतकर, घनश्याम म्हस्के, अमोल शिंदे, बाबासाहेब पाडळे, चंदू खामकर आदीं उपस्थित होते. महादेव गवळी यांनी सभेचे प्रास्ताविक केले. नगर पंचायत समितीचे माजी उपसभापती डॉ. दिलीप पवार यांनी ग्रामसुरक्षा दल पुन्हा सक्रिय करावेत, काही होमगार्ड बंदोबस्तासाठी तैनात करावेत अशी मागणी केली.

### मुख्य चौकात सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत

परिसरात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मुख्य चौकात सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, जे नादुरुस्त आहेत ते दुरुस्त करण्याची मागणी तरुणांनी केली. यावर सरपंच प्रियंका लामखडे यांनी तातडीने दुरुस्ती करून मुख्य चौकात कॅमेरे बसविण्यात येतील अशी माहिती दिली.



शहरातील विविध प्रश्नांसंदर्भात महापालिकेत आयोजित आढावा बैठकीत खा. निलेश लंके यांच्यासमवेत शिष्टमंडळ. (छाया - लहू दळवी)

## तोडगा निघेपर्यंत मनपाने शहरातील गाळेधारकांवरील कारवाई थांबवावी

(पान १ वरुन)

मागविण्यात यावे व सामोपचाराने हा प्रश्न मार्गी लावावा, असेही ते म्हणाले.

केंद्र शासनाच्यावतीने शहरात गॅस पाईपलाईनचे काम सुरू आहे. सदर काम अतिशय संथगतीने सुरू असून महापालिकेने परवानगी दिलेल्या ४ वॉर्डामध्ये केवळ १५ ते २० टक्केच काम झाले आहे. त्यामुळे संबंधित एजन्सीने येत्या चार महिन्यात या चारही वॉर्डातील काम पूर्ण करावे अन्यथा सदर एजन्सीच्या विरोधात केंद्रीय पेट्रोलियम मंत्र्यांकडे तक्रार करण्यात येईल, असा इशारा खा. लंके यांनी यावेळी दिला. नेहरू मार्केटच्या जागी महापालिकेच्यावतीने खाजगीकरणातून व्यापारी संकुल उभारण्याचे प्रस्तावित केलेले आहे.

सदर ठिकाणी संकुल उभारताना त्या ठिकाणी पूर्वी असलेले मूळ भाजीविक्रेते यांना जागा उपलब्ध करून देण्याबाबत विचार व्हावा व त्यादृष्टीने नियोजन करावे, अशा सूचनाही लंके यांनी दिल्या.

# शहरात फोटोकॉपी विक्रेत्यांमध्ये 'कॉपीराइट'बाबत जागरूकता

### पायरसीच्या विरोधात एनईएलचा सक्रिय पुढाकार



नगर - पायरसीचा मुकाबला करण्यासाठी आणि साहित्य चोरीचा धोका टाळण्यासाठी आपली सक्रिय मोहीम एनईएल ने सुरू ठेवली आहे, शैक्षणिक क्षेत्रातील नैतिकतेला चालना देण्याच्या नवनीतची समर्पण भावना यातून प्रतिबिंबित होते. या वर्षाच्या सुरुवातीच्या यशस्वी प्रयत्नानंतर, नवनीत एज्युकेशन लिमिटेड शैक्षणिक पायरसीच्या विरुद्धचा लढा चालू ठेवत आहे. सदर उपक्रमाद्वारे, फोटोकॉपी विक्रेते आणि व्यापक समाजामध्ये कॉपीराइट उल्लंघनाच्या कायदेशीर आणि नैतिक परिणामांबद्दल जागरूकता वाढवणे, हे एनईएल चे उद्दिष्ट आहे. अनेक व्यक्तींना पायरसीच्या कायदेशीर आणि सामाजिक परिणामांबद्दल पुरेशी माहिती नसावी, हे ओळखून नवनीत ने या समस्येचे थेट निराकरण करण्यासाठी सक्रिय पुढाकार घेतला आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, जानेवारी २०२५ मध्ये, महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये - अहिल्यानगर (अहमदनगर) आणि जवळपासच्या शहरांमध्ये विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले, ज्यात कायदा अंमलबजावणी संस्था, नवनीतचे स्थानिक प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी, आणि दूरदर्शीपणे नियुक्त निरीक्षकांचा समावेश होता. साहित्य निर्मात्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि शैक्षणिक साहित्यासाठी योग्य जागा सुनिश्चित करण्यासाठी पायरसीविरुद्ध एनईएल चा लढा प्रकाशन संस्थेची बांधिलकी अधोरेखित करतो. या लढ्यामुळे समाजामध्ये पायरसीमुळे होणाऱ्या हानीबद्दल जागरुकता येईल आणि कॉपीराइट कायद्यांचा आदर तसेच समर्थन करण्यासाठी अधिक लोक प्रेरित होतील, अशी नवनीतला आशा आहे. ब्रँडिंग प्रमुख देविश गाला यांनी याविषयी माहिती दिली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### केळी खा, लाभ मिळवा

केळी हे एक फळ आहे जे केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. केळ्यामध्ये असलेले पोटॅशियम सिडिटी कमी करण्यास मदत करते. हे पोटातील ॲसिडचे उत्पादन नियंत्रित करते आणि गॅस, अपचन आणि छातीत जळजळ यापासून आराम देते.

## पाककला

### खरवसाचे धिरडे

**साहित्य :** खरवसाचे दूध, ओल्या मिरच्या, कोथिंबीर, कांदा, मीठ, तूप, थोडीशी कणीक

**कृती :** खरवसाचे दूध चार वाट्या घ्यावे. त्यात अर्धी वाटी कणीक आणि चवीपुरते मीठ घालावे व सर्व चांगले कालवावे. नंतर कांदा व ओल्या मिरच्या बारिक चिरुन घालाव्यात व कोथिंबीर घालावी. नंतर सर्व एकत्र कालवून, एकजीव करुन घ्यावे व तव्यावर तूप सोडून, त्यावर वरील मिश्रण घालून धिरड्यासारखे परतून काढावे. चिटणी बरोबर किंवा सॉसबरोबर सर्व्ह करावे.

## वास्तू

### आर्थिक स्थिती मजबूत होण्यासाठी

पूर्व दिशा ही सूर्यदेवाची दिशा आहे आणि पिवळा रंग सूर्यदेवाचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे पिवळ्या रंगाच्या वस्तू पूर्व दिशेला ठेवल्याने सूर्यदेवाची कृपा होते आणि घरात सकारात्मक ऊर्जा येते. पिवळा रंग देखील संपत्ती आणि समृद्धीचे प्रतीक मानला जातो. पिवळ्या रंगाच्या वस्तू पूर्व दिशेला ठेवल्याने घरात धनसंपत्ती येते आणि कुटुंबाची आर्थिक स्थिती मजबूत होते.

## सल्ला

घरात पाल हा प्राणी नको असल्यास कपाटात, दारांच्या फटीत मोरपिसे ठेवा अथवा चिकटवा याला घाबरुन पाल पळून जाईल.

## सौंदर्य

सुरकुत्या दूर करण्यासाठी तुम्ही तिळाचे तेल वापरू शकता. यामध्ये ॲंटिऑक्सिडंट्स असतात, जे सुरकुत्या दूर करण्यास मदत करतात. तसेच, तुम्ही तिळाच्या तेलात मिसळून मुलतानी माती वापरू शकता. हा पॅक ३० मिनिटांसाठी लावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ३० जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, माघ शुक्लपक्ष, श्रवण ०७।१५ धनिष्ठा २९।५१, सूर्योदय ०६ वा. २५ मि. सूर्यास्त ०५ वा. ३६ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. घरांत उत्साहाचे वातावरण होईल. पौर्णिमा कालावधी धडाडीचा राहील.

**वृषभ :** आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयर संदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता.

**मिथुन :** ठरविलेले काम पूर्ण करण्यासाठी काही प्रसंग प्रेरणादायी ठरतील. यथायोग्य विचार करून कार्य कराल. उत्साहाचे वातावरण निर्माण होत राहील.

**कर्क :** निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील. आरोग्याची काळजी घ्या. व्यापार व्यवसायात वेळ साधारण राहील. देवाण-घेवाण टाळाल.

**सिंह :** आजचा दिवस आपल्या कार्य-योजनेंसाठी आणि सहकार्यांबरोबर आपल्या संबंधांसाठी विधायक ठरेल.

**कन्या :** अधिक चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध कराल. मातृचिंता सतावेल. शुभ ग्रहांची साथ उत्तम राहील. परिणामी मन प्रसन्न राहील.

**तूळ :** बेपवाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यवाहीत खोळंबा निर्माण करू शकते. जोडीदाराची मदत मिळेल.

**वृश्चिक :** सार्वजनिक जीवन बहुमूल्य राहील. आपणास एखाद्या योजनेसाठी इतरांचे सहकार्य घ्यावे लागेल.

**धनु :** हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो. आपल्या बोलण्या मुळे कोणाला तरी संताप येईल. प्रकृती उत्तम राहील.

**मकर :** आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर लोक आपल्या मदतीला येतील. इतर योजना आणि उपक्रम नेहमीसारखेच चालू राहतील.

**कुंभ :** आपणास गरज असेल तेव्हा कुटुंबियांचे सहकार्य मिळेल. मागील उधारी वसुल होईल.

**मीन :** आपल्या आर्थिक मुद्द्यांनुसार एखाद्याचे मन वळविणे कठिण होईल. इतरां समोर आपले विचार मांडाल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

### 'पहिला रुग्ण'

डॉक्टरांचा बारा वर्षांचा मुलगा त्याच्या मित्राबरोबर दवाखान्यात खेळत होता. डॉक्टरांच्या तपासणी खोली शेजारील खोलीत हाडांचा सांगाळा होता. मुलाच्या मित्राने विचारले,

''हे काय आहे?''

डॉक्टरांचा मुलगा म्हणाला,


''तो माझ्या वडिलांचा पहिला रुग्ण आहे.''

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* एएसटीने कोणत्या राज्यातील बांधवगड येथे २० बौद्ध गुफांचा शोध लावला? - मध्यप्रदेश

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७१०३ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१०२ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) युग; हंगाम ४) जामीन; हमी; प्रतिभू ७) आसपास; आजूबाजूला ८) हिंदू वर्षाचा अकरावा महिना ९) एखाद्या तीर्थक्षेत्राला ठराविक दिवशी नियमित जाणे १०) लग्नातील नवरदेवाकडील मंडळी १३) पदार्थ; सामान १४) पिकात वाढलेले अनावश्यक गवत १६) एक समसंख्या १८) नातलग; नातेवाईक २०) अहंकार; ताठा २२) बहिणीची मुलगी २३) मातीच्या भांड्याचा फुटका तुकडा २४) कुठेच न थांबता; लागलीच; थेट

**उभे शब्द :-** २) घरातील मधला भाग ३) नामाभिधान; होडी; जहाज ४) पूर्वेकडील एक अतिप्रगत देश ५) महिना; माह ६) सिद्धता; सज्जता ८) पश्चिम दिशा ९) इमारत; भवन; बिल्डिंग ११) सचोटीविषयीचा दुसऱ्याचा विश्वास १२) काळाचा अतिसूक्ष्म अंश १३) एक प्रकारचे साधे जेवण १५) हेतू; योजना १७) जवळ; नजीक १९) काही जनावरांच्या अंगावर चिकटून राहतो तो एक रक्तशोषक कीटक २१) पंख; दुसरा

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** 'विचार' असे मांडा की तुमच्या विचारांवर कोणीतरी 'विचार' केलाच पाहिजे.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### मोबाईलचा शोध कोणी लावला?

भ्रमणध्वनी हे एक इलेक्ट्रॉनिक्स उपकरण (यंत्र) असून याचा दूरसंचारासाठी उपयोग केला जातो. याला इंग्रजीमध्ये मोबाईल फोन (मोबाईल) किंवा सेल्युलर फोन (सेल फोन) असे म्हणतात. भ्रमणध्वनीच्या साहाय्याने संभाषणाची व माहितीची देवाणघेवाण करता येते. पारंपरिक दूरध्वनी उपकरणे घरामध्ये एकाच जागी ठेवून वापरावी लागतात. जगातील पहिला मोबाईल फोन मोटोरोला कंपनीच्या मार्टिन कूपर ह्या व्यक्तीने १९७३ साली विकसित केला व वापरून दाखवला. १९९० साली जगभरात १.२४ कोटी मोबाईल फोन वापरकर्ते होते. २००९ सालाअखेरीस हा आकडा ४.६ अब्ज इतका आहे. सध्या विकसित देशांमधील १०० व्यक्तींपैकी ९७ तर जगातील १०० व्यक्तींपैकी ४५ व्यक्ती मोबाईल फोन वापरतात. मार्टी कूपर आणि त्यांच्या अभियंत्यांच्या कार्यसंघाने मोटोरोलामध्ये १५ वर्षे सेल्युलर फोन आणि त्याबरोबर जाणारे स्विचिंग उपकरणे विकसित केली.

३ एप्रिल १९७३ रोजी त्यांनी पहिला सेल्युलर कॉल केला. मोटोरोलाने ताबडतोब संपूर्ण सेल्युलर बाजार ताब्यात घेतला आणि बऱ्याच वर्षांपर्यंत ९०% बाजारपेठ राखली. परंतु त्यांची सिस्टम एनालॉग होती आणि फोन मोठे होते. जेव्हा डिजिटल क्रांती उत्तरार्धात आली तेव्हा '९०' च्या मोटोरोलाने आपली बाजारपेठेवरील पकड गमावली. त्यांच्याकडे बाजारासाठी डिजिटल फोन तयार नाही. त्यांचा बाजारपेठेतील मोठा हिस्सा गमावला.

### माकड आणि ससा

एका मोठ्या जंगलात एक माकड आणि एक ससा खूप प्रेमाने राहत होते. दोघांची इतकी चांगली मैत्री होती की ते नेहमी एकत्र खेळायचे आणि सुख-दुःख वाटून घ्यायचे.

एके दिवशी खेळत असताना माकड म्हणाले, मित्रा, आज एक नवीन खेळ खेळूया. सशाने विचारले, मला सांग, तुला कोणता खेळ खेळायचा आहे?

माकड म्हणाले, आज आपण दोघांनी लपाछपी खेळायला हवी.

ससा हसायला लागला आणि म्हणाला, ठीक आहे, चला खेळूया. खूप मजा येईल.

जंगलातील सर्व प्राणी-पक्षी इकडे तिकडे धावत असल्याचे पाहून माकडाने लगबगीने जवळच्या कोल्ह्याला विचारले, अरे, काय झाले? सगळे का पळत आहेत?

कोल्ह्याने उत्तर दिले, एक शिकारी जंगलात आला आहे, म्हणून आम्ही सर्वजण आपला जीव वाचवण्यासाठी धावत आहोत. तू सुद्धा पटकन पळत नाही तर तो तुला पकडेल. असे बोलून कोल्हा पटकन तिथून पळून गेला.

कोल्ह्याचे बोलणे ऐकून माकड आणि ससा घाबरून पळू लागले. धावत धावत दोघेही त्या जंगलापासून दूर आले.

मग माकड म्हणाले, मित्रा सश्या, आपण सकाळपासून धावत आहोत. आता संध्याकाळ झाली. चला, थोडी विश्रांती घेऊया. मी थकलोय.

ससा म्हणाला, हो, थकलोच नाही तर खूप तहानही लागली आहे. चला थोडं पाणी पिऊया. मग आपण आराम करू.

माकड म्हणाले, मलाही तहान लागली आहे. चला, पाणी शोधूया.

दोघेही एकत्र पाणी शोधण्यासाठी बाहेर पडले. काही वेळातच त्याला पाण्याचे भांडे सापडले. त्यात फारच कमी पाणी होते. आता ससा आणि माकड दोघांनाही वाटले की आपण हे पाणी प्यायले तर आपला मित्र तहानलेलाच राहील.

आता ससा म्हणू लागला, मित्रा तू पाणी पि. मला फार तहान नाही. तू खूप धावला आहेस, त्यामुळे तुला खूप लागली असेल.

तेव्हा माकड म्हणाले, मित्रा, मला तहान लागली नाही. तु पाणी पी. मला माहीत आहे तुला खूप तहान लागली आहे.

दोघेही एकमेकांना वारंवार पाणी पिण्यास सांगत होते. जवळून जाणारा हत्ती थोडावेळ थांबला आणि त्यांचे संभाषण ऐकू लागला.

काही वेळाने हत्तीने हसून विचारले, तुम्ही दोघे पाणी का पीत नाही ?

ससा म्हणाला, हे बघ हत्ती दादा, माझ्या मित्राला तहान लागली आहे, पण तो पाणी पीत नाही. माकड म्हणाले, नाही नाही दादा, ससा खोटे बोलत आहे. मला तहान लागली नाही. त्याला तहान लागली आहे, पण तो मला पाणी देण्याचा आग्रह धरतो.

हे दृश्य पाहून हत्ती बोलू लागला, तुमच्या दोघांची मैत्री खूप घट्ट आहे. हे सर्वांसाठी एक छान उदाहरण आहे. तुम्ही दोघे हे पाणी पीत नाही. तुम्ही दोघेही हे पाणी अर्धे वाटून पिऊ शकता.

ससा आणि माकड दोघांनाही हत्तीची सूचना आवडली. त्याने अर्धे पाणी प्यायले आणि मग थकवा घालवण्यासाठी विश्रांती घ्यायला सुरुवात केली.

तात्पर्य : खऱ्या मैत्रीत स्वार्थाला स्थान नसते.

## रहमते दर्शन (भाग - १)



तभी मैंने उपस्थित सभी लोगों को भजन पर बैठ जाने के लिए कहा। आधे घंटे के पश्चात सबके आश्चर्य का ठिकाना न रहा जब मेरे पिताजी के मृत शरीर में हलचल होने लगी और वे उठकर बैठ गये। मैंने जब अपने पिता जी से हाल पूछा तो उन्होंने बताया कि एक सरदार ने मुझे यमराज से छुड़ाया है। यमराज ने कहा कि महाराज जी, यह आपका जीव नहीं है, यह जीव तो हमारा है। महाराज जी उसे मारने लगे और पूछा कि इसके लड़के ने किससे नाम लिया है? यमराज ने कहा, संत कृपालसिंह जी महाराज से और इसकी घरवाली ने संत दर्शनसिंह महाराज से नाम लिया है। अब बताओ यह जीव किसका हुआ? तो यमराज ने कहा, आपका। फिर उस सरदार ने यमराज को एक सोटी मारी और वह भाग गया। इसके बाद मेरे पिता जी को भी ३ अप्रैल को नामदान मिल गया। इस प्रकार की बहुत सी अनेक घटनायें हैं, जिन्हें

### मधुर यादें

यदि मैं बयान करने लगूँ तो अनेकों किताबें लिखी जा सकती हैं। इसलिये महाराज जी की दया का शुक्राना करने में असमर्थ मैं अपनी बात यहीं ख़त्म करता हूँ।

#### दया की भीक

मैंने सन् १९६७ में परम संत कृपालसिंह जी महाराज से नामदान लिया। मैं महाराज जी की सेवा करना चाहता था पर मुझे सेवा का मौका नहीं मिला। १९७१ में महाराज कृपालसिंह जी देवलाली आये और मेरे मन की भावना को समझकर मुझे बुलाया और कहने लगे, मैं सत्संग में जो कुछ भी कहूँ, आप उसे मराठी में अनुवाद करके संगत को सुनाइये। मैं नया था, इसलिये महाराज जी के सत्संग का अनुवाद करने में घबराने लगा। महाराज जी ने कहा, घबराओ नहीं, मैं तुम्हारे साथ हूँ। अब मुझे लगने लगा कि महाराज जी मुझसे कुछ काम लेना चाहते हैं। मगर हाय! मेरी किस्मत, महाराज जी ने तीन साल के बाद चोला छोड़ दिया और मुझे कोई ख़ास सेवा न मिल सकी। महाराज जी के चोला छोड़ने के तीन साल बाद मेरी पहली मुलाकात संत-सत्गुरु दर्शनसिंह जी महाराज से कृपाल आश्रम में हुई। चोपड़ा साहब ने मेरा परिचय महाराज जी से करवाया। हालाँकि महाराज जी अंतर्यामी थे और सब कुछ जानते थे। परिचय होने पर महाराज जी ने मुझसे कहा कि हमारे मिशन का साहित्य अभी मराठी भाषा में प्रकाशित नहीं हुआ है, आप यह काम शुरू करो। दिलों के जानने वाले सत्गुरु ने मेरे दिल का भाव जान लिया और मुझे सेवा का अवसर प्रदान किया। महाराज जी की दया से ही सबसे पहले मराठी भाषा में एक छोटी किताब ओ इंसान! अपने आप को जान यानी हे मानवा! तू स्वतःला ओळख प्रकाशित हुई। इसके पश्चात १९८४ में मराठी 'सत्-संदेश' शुरू हुआ, जो अभी तक चल रहा है। अब तक महाराज जी की ५-६ किताबों का

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

दूसरे की योजना का हिस्सा बन जाएंगे। आप को दूसरों की योजना अनुसार काम करना पड़ेगा। हम सभी जीवन में सर्वश्रेष्ट करना चाहते हैं। सर्व श्रेष्ट करने की सब से आसान विधि हैं। आप इस पल जो कर रहें हैं उसे सर्वश्रेष्ट ढंग से करें। इसी पल सर्व श्रेष्ट करने की सब से आसान विधि है। इसी पल कोई बुक पढ़ें या साधना करें, जिस से आप का शारीरिक, मानसिक या आध्यात्मिक विकास हो। हर महीने कम से कम एक या चार नई पुस्तकें पढ़ने का लक्ष्य रखें। अगर आप तीव्रगति से विकास चाहते हैं और विश्व में टाप पोजीशन पर आना चाहते हैं तो हर रोज एक नई पुस्तक पढ़ें। अगर आप अष्ट रत्नो की लिस्ट में आना चाहते हैं तो हर रोज एक अव्यक्त मुरली की बुक पढ़ा करो। उसके बाद आश्रम द्वारा छापी सामग्री की एक पुस्तक हर रोज पढ़ें। ये कार्य जीवन भर करना है। मां-बाप, भाई-बहिन,

### दिमाग की शक्ती

पति -पत्नी में प्यार तो है, परंतु कहना नहीं पड़ता। वे एक दूसरे पर विश्वास करते हैं इसलिए उन में प्रेम रहता है। यदि प्रेम पाना है, प्रेम करना है, प्रेम देना है तो विश्वास करना भी उतना ही जरूरी है।

आप जो काम कर सकते हैं अथवा जिस काम को करने के बारे आप ने सोचा है उसे आरंभ कर दीजिए। अपने को दुर्बल समझने की भावना वास्तव में सच नहीं होती। दुर्बलता तो मन की 'एक बीमारी' है। जब व्यक्ति यह सोचने लगता है कि यह काम मेरे लिये असंभव है और मैं यह काम नहीं कर सकता तो किसी विज्ञान या किसी टोने टोटके में इतनी ताकत नहीं है कि वह काम करवा सके। अपने शब्दकोश से दुर्भाग्य और असंभव जैसे शब्दों को मन में आते ही बाहर निकाल दें। इस के बजाए सौभाग्य, संभव और निश्चिंत जैसे शब्दों को मन में स्थान दें। अच्छे विचार सभी के दिमाग में आते हैं। परंतु यह एक पक्षी की तरह होते हैं। अगर पक्षी को पिंजरे में केद नहीं करेंगें तो वह उड़ जाएंगे। जैसे ही कोई अच्छा विचार आये उसे तुरंत किसी कागज या कापी में नोट कर लें। जब आप विश्वास जताते हैं तो आप के मस्तिष्क में एक चुंबकीय शक्ति उत्पन्न करते हैं, जो आकर्षण के नियम अनुसार श्रेष्ट को आप की ओर आकर्षित करता है। कोई भी समस्या आती है, उस समय देखो आप के दिल में क्या है। अच्छा या बुरा, कमजोर या शक्तिशाली। आप के पास वही लौट कर आएगा जो आप के दिल में है। काफी लोग कहते हैं, सोचने से क्या होता है, जो होना होगा, खुद हो ही जाएगा। यह गलत सोच है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

अशा वेळेला दोन्हीकडील पार पाडताना तिची शारीरिक व मानसिक ओढाताण होते. अशी तारेवरची कसरत तिला स्वतःच्या प्रकृतीकडे लक्ष द्यायला वेळही नसतो. त्याचा दुष्परिणाम होऊन स्तन्य की कमी होते. बालक हे पूर्णतः आईच्या शारीरिक व मानसिक स्थितीवर अवलंबून असते. आई चिडचिड करीत असताना, रडत असताना स्तनपान करत असेल त्या वेळी बाळ होऊन दूध घेत नाही. असा अनुभव बऱ्याच वेळेला येतो. याकरिता स्त्रीला कुठल्याही प्रकारचा मानसिक ताण-तणाव येणार नाही याची काळजी घ्यावी.

**स्तन्यवृध्दीसाठी उपाययोजना :** १) स्तन्याची उत्पत्ती चांगली व भरपूर व्हावी; म्हणून दुर्वांकुर शतावरीकल्प १ ग्लासभर दुधातून २-२ चमचे दोन वेळा द्यावा.

२) अश्वगंधा, मुसळी ही द्रव्य व कार्पास बीज, आळीव, खसखस, गोडांबी, चारोळी यांच्यापासून

### नवजात बालकाची परिचर्या

बनविलेल्या खीरी भरपूर, केशर घालून सेवन कराव्यात.

३) स्तन्य शुद्धीकरता आहारामध्ये ओली हळद, हिंग, जिरे यांचा फोडणीसाठी वापर करावा. तसेच मधुरगुणात्मक स्निग्ध भोजन करावे व त्यानंतर द्राक्षासव दोन चमचे घ्यावे.

४) एक लिटर स्वच्छ पाण्यात रात्री ५० ग्रॅम बाळंतशेपा भिजत घालव्यात. सकाळी ते पाणी उकळून गाळून घ्यावे व त्यात थोडे तूप घालून प्यायल्याने स्तन्य (दूध) वाढविण्यास मदत होते.

५) बाळाला अंगावर पाजण्यापूर्वी थोडेसे फुटाणे, शेंगदाणे किंवा कपभर कोमट दूध अथवा पाणी प्यावे. याने दूध सुटण्यास मदत होते.

६) सकाळी व संध्याकाळी आळीवाची खीर किंवा आळीवाचा लाडू खावा.

७) पिंपळी, सुंठ, हिरडा, विदारी कंद चूर्ण १ चमचा घेऊन त्यात अर्धा चमचा गळा व १ चमचा तूप हे मिश्रण दुधाबरोबर घ्यावे. याने स्तन्य वाढण्यास मदत होते. सीपी पातळ भाजी, तसेच खसखशीची आमटी, ओल्या नारळाची आमटी जेवणामध्ये वापरावी. ९) सकाळ-संध्याकाळ लेपटॅडीन गोळी डॉक्टरांच्या सल्ल्याने घ्यावी. हलक्या हाताने नियमित मालीश करावी. याने स्तन्यवृद्धीस मदत होते व तसेच स्तनांमध्ये दुधाच्या गाठी देखील राहत नाहीत.

१०) स्तनांवर हलक्या हाताने नियमित मालीश करावी. याने स्तन्यवृद्धीस मदत होते व तसेच स्तनांमध्ये दुधाच्या गाठी देखील राहत नाहीत.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो

## सुरेखाताई कोतकर यांचे प्रतिपादन; भाग्योदय माध्य.व उच्च माध्य विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम व वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम

नगर – शाळेमधून विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञान तर मिळतेच पण विविध सहशालेय उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कला गुणांचा विकास होतो. यामधून उद्याचा शास्त्रज्ञ, अभिनेता, लोकप्रतिनिधी, वक्ता अभियंता, संशोधक निर्माण होत असतात. विद्यार्थ्यांनी वर्षभर शाळेत घेतल्या जाणार्या शालेय स्पर्धा व सहशालेय उपक्रमात भाग घेतला पाहिजे यामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व सर्व गुण संपन्न बनते शालेय जीवनात मिळालेले ज्ञान हे आपणास आयुष्यभर मार्गदर्शक ठरत असते. आज प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा वाढली असल्याने स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी कठोर मेहनती शिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन भैरवनाथ एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्षा सुरेखाताई कोतकर यांनी केले.



भाग्योदय माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम आणि वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी भैरवनाथ एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुरेखाताई कोतकर.

भाग्योदय माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम आणि वार्षिक पारितोषिक वितरणाप्रसंगी भैरवनाथ एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुरेखाताई कोतकर या बोलत होत्या. याप्रसंगी संस्थेचे सचिव सचिन भानुदास कोतकर, केडगांवचे माजी सरपंच गोविंद कोतकर, उद्योजक जयदेव खकाळ, संस्थेचे संचालक रघुनाथ लोंढे, गणेश सातपुते, उद्योजक प्रसाद आंधळे, नगरसेविका लताताई शेळके घोडके, गुरुजी प्राचार्य ज्ञानदेव बेरड, रेणुका माता शाळेचे मुख्याध्यापक बन्सी नरवडे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना सौ. कोतकर म्हणाल्या की, भाग्योदय विद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेत असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. याचा विद्यार्थ्यांनी आपल्या प्रगतीसाठी उपयोग करून घ्यावा असे आवाहन जिल्हा सहकारी बँकेच्या माजी संचालिका अध्यक्ष सुरेखाताई कोतकर यांनी केले.

प्रास्ताविकात विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड म्हणाले शाळा ही समाजाची प्रतिकृती आहे. शाळा हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. शाळेतून भावी पिढी घडविण्याचे काम केले जाते. भाग्योदय विद्यालयात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, गणित विज्ञान प्रदर्शन, क्रीडा मेळावे, प्रश्नमंजुषा स्पर्धा परीक्षा वकृत्व स्पर्धा अमृतवेल हे हस्तलिखित अशा विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे गेल्या अनेक वर्षापासून विद्यालयाला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. स्वच्छ सुंदर विद्यालय, फाईव्ह स्टार नामांकन, मुख्यमंत्री माझी शाळा स्वच्छ शाळा तालुक्यामध्ये द्वितीय क्रमांक मिळाला संस्था चालकांचे सहकार्य आणि पालक शिक्षकांचे सहकार्याने विद्यालयाच्या प्रगतीचा आलेख उंचावत असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी उद्योजक सचिन भानुदास कोतकर, उद्योजक प्रसाद आंधळे, रघुनाथ लोंढे आदींनी आपल्या मनोगत आतून विद्यालयाच्या प्रगतीचे कौतुक केले.

विद्यालयात राष्ट्रभक्ती, एकात्मता, स्त्री शिक्षण नाटिका, शिवराज्याभिषेक सोहळा, कोळीगीत, गणेश वंदना, गरबा दांडिया असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम विद्यालयाने सादर केले. तसेच विद्यालया मध्ये वर्षभर घेतल्या जाणाऱ्या शालेय व सहशालेय स्पर्धेमध्ये विजेत्या खेळाडूंना ट्रॉफी प्रमाणपत्र बक्षीस वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी विद्यालयाचे कोतकर बाबासाहेब, साहेबराव कार्ले, सोपान तोडमल, धनंजय बारगळ, संतोष काकडे, आदिनाथ ठुबे, ज्युनियर कॉलेजचे कदम गोविंद, गोरक्ष कांडेकर एकनाथ होले, दत्तात्रय पांडुळे सौ. रुपाली शिंदे, सौ. रेणुका गुंड, गणेश गायकवाड, बाळू कावरे, गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.



सार्वजनिक स्वच्छतेचा संदेश देऊन प्रजासत्ताक दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

# सार्वजनिक स्वच्छतेचा संदेश देऊन प्रजासत्ताक दिवस साजरा

नगर – शहरातील रामवाडी परिसरात सार्वजनिक स्वच्छतेचा संदेश देऊन प्रजासत्ताक दिवस साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आलेल्या विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले.

प्रारंभी प्रकाश वाघमारे व विकी इंगळे यांच्या हस्ते ध्वाजरोहण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी तोफखाना पोलीस स्टेशनचे सुनिल शिरसाठ, दीपक साबळे, राजू (मामा) दिनकर, अशोक भोसले, रमेश केजरला, समीर सय्यद, सागर वाळुंज, क्षितिज व परिस बालभावनातील सर्व सहकारी, परिसरातील नागरिक उपस्थित होते.

प्रकाश वाघमारे म्हणाले की, आरोग्यासाठी सार्वजनिक स्वच्छता महत्त्वाची असून, नागरिकांमध्ये सार्वजनिक स्वच्छतेची जागृती निर्माण झाल्यास रोगराईला आळा बसणार आहे. रामवाडी भागातील नागरिकांच्या आरोग्यासाठी व सार्वजनिक स्वच्छतेसाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विकी इंगळे म्हणाले की, रामवाडी भागात सर्वसामान्य कष्टकरी वर्ग राहत आहे. विकासापासून वंचित राहिलेल्या या भागातील नागरिकांना विविध–सोयी सुविधा मिळण्यासाठी व मुलांच्या शिक्षणासाठी सुविधा निर्माण करुन देण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# विभागीय मराठी नाट्य संमेलनात नगरचे ज्येष्ठ रंगकर्मी पी. डी. कुलकर्णी यांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान

नगर – नगरमध्ये झालेल्या अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी ज्येष्ठ रंगकर्मी प्रवीण कुलकर्णी तथा पीडीकाका यांचा अहिल्यानगर उपनगर शाखेच्यावतीने जीवन गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे व संमेलनाध्यक्ष पद्मश्री डॉ. जब्बार पटेल यांच्या हस्ते पी. डी. कुलकर्णी यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला.



मराठी नाट्य संमेलनात ज्येष्ठ रंगकर्मी पी. डी. कुलकर्णी यांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी अ.भा. मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष, ज्येष्ठ रंगकर्मी प्रशांत दामले, अ.भा. मराठी नाट्य परिषदेचे विश्वस्त मोहन जोशी, अशोक हांडे, ९९ व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे प्रेमानंद गज्वी, अभिनेते भरत जाधव, विभागीय नाट्यसंमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ.बापूसाहेब कांडेकर, संमेलन प्रमुख क्षितिज झावरे, उपनगर शाखा अध्यक्ष प्रा.प्रसाद बेडेकर, प्रमुख कार्यवाहक चैत्राली जावळे व नाट्य परिषदेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



'पीडी' काका म्हणून परिचित असलेले प्रवीण कुलकर्णी हे तब्बल पाच दशकांपासून रंगभूमीची सेवा करीत आहेत. आजही ते त्याच उत्साहाने योगदान देत आहेत. नगरमधील नव्या, जुन्या हौशी रंगकर्मींसाठी ते हक्काचे मार्गदर्शक आहे. विभागीय मराठी नाट्य संमेलनाच्या अवघ्या २० दिवसांच्या तयारीत त्यांनी मार्गदर्शन आणि सक्रिय योगदान दिले. बँकिंग क्षेत्रात नोकरी, क्रीडा, साहित्य अशा विविध क्षेत्रात योगदान देताना त्यांनी सामाजिक कार्यातही मोठे योगदान दिले आहे. रंगभूमी म्हटले की आज वयाच्या सत्तरीतही त्यांचा उत्साह तरूणांनाही लाजवणारा असतो. स्वतः उत्तम अभिनेते, दिग्दर्शक असलेले पी. डी. कुलकर्णी उत्तम कलाकार घडवणारे शिक्षकही आहेत. अनेक जणांना त्यांनी प्रथम रंगभूमीवर काम करण्याची संधी दिली. नगरचे भूषण असलेले पीडीकाका गेल्या ५० वर्षाहून अधिक काळ रंगभूमीवर कार्यरत असलेले नगरमधील एकमेव रंगकर्मी आहेत. २२ वर्षांनंतर नगरमध्ये मराठी नाट्य संमेलन होत असताना त्यांचा नाट्य परिषदेने सर्व रंगकर्मी व नाट्य रसिकांच्या वतीने जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले

# कोहिनूर मॉलमध्ये कलाकारांसाठी मोफत 'कलाविष्कार' आर्ट गॅलरी उपक्रमास सुरुवात

नगर – सावेडीच्या कोहिनूर मॉल मध्ये अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील चित्रकार, शिल्पकार यांच्यासारख्या कलाकारांसाठी खास 'कलाविष्कार' ही आर्ट गॅलरी निर्माण करण्यात आली आहे. दर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात या आर्ट गॅलरीमध्ये कलाकारांना आपल्या कलेचे मोफत प्रदर्शन भरवता येणार आहे. मॉलचे संचालक अश्विन गांधी यांच्या संकल्पनेतून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे.



सावेडीच्या कोहिनूर मॉलमध्ये सुरू असलेल्या कलाविष्कार गॅलरीमध्ये सुरु असलेल्या चित्रांच्या प्रदर्शनास नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे.

अश्विन गांधी म्हणाले, नगरमध्ये मोठ्या प्रमाणात होतकरू कलाकार आहेत. चित्रकला, शिल्पकला याचा छंद जोपासत आहेत. अशा स्थानिक कलाकारांना त्यांची कला नागरिकांपर्यंत पोहोचवता यावी व त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने मॉलमध्ये कलाविष्कार या आर्ट गॅलरीची निर्मिती करण्यात आली आहे. या गॅलरीमध्ये कलाकार आपल्या चांगल्या कलेचे प्रदर्शन मोफत लावू शकतात.

कलाविष्कार या आर्ट गॅलरीत कलाकृतींच्या प्रदर्शनासाठी लाईट सह आवशयक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

आर्ट गॅलरीचा स्थानिक कलाकारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संचालिका निता गांधी यांनी केले आहे.

# नगरमध्ये २ फेब्रुवारी रोजी नाट्यप्रवेश स्पर्धेची अंतिम फेरी

नगर – संस्कार भारतीतर्फे प्रांतस्तरीय नाट्यप्रवेश स्पर्धेची अंतिम फेरी २ फेब्रुवारीला नगरमध्ये होत आहे. या वेळी प्रमुख पाहुणे कादंबरीकार, नाटककार व विचारवंत अभिराम भडकमकर मार्गदर्शन करणार आहेत. संस्कार भारतीचे महामंत्री प्रशांत कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती असेल.




स्पर्धेची प्राथमिक फेरी अहिल्यानगर, नाशिक व सोलापूर या केंद्रांवर यापूर्वीच झाली आहे. त्यातून निवड झालेल्या नाटकांची अंतिम फेरी रविवारी सकाळी ९.३० ते सायंकाळी ४.३० या वेळेत सावेडीतील माऊली सभागृहात होणार आहे. त्यानंततर सायंकाळी ६.३० वाजता भरतमुनी जयंती उत्सव होईल.

स्व. प्रा. मंगेश जोशी यांच्या आठवणींना उजाळा या वेळी देण्यात येणार आहे. त्यानंतर स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ होईल. स्पर्धेचे हे यंदा दुसरे वर्ष आहे.

कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन स्पर्धाप्रमुख शांभवी जोशी, संस्कार भारतीचे अध्यक्ष ॲड. दीपक शर्मा, सचिव स्नेहल झांबरे यांनी केले आहे.

# व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष महेश गुगळे यांचा प्रदेश भाजपाकडून विशेष सन्मान

नगर – प्रदेश भारतीय जनता पार्टीकडून येणारे सर्व कार्यक्रम, सर्व उपक्रम व पक्षाच्या ध्येय धोरणांची नगर शहरात प्रभावी अंमलबजावणी करून यशस्वीपणे राबविल्याबद्दल भाजपाच्या अहिल्यानगर व्यापारी आघाडीचे शहर जिल्हाध्यक्ष महेश गुगळे यांचा प्रदेश भाजपाकडून विशेष सन्मान करण्यात आला. भाजपचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनी दिलेले सन्मानपत्र नुकतेच प्रदेश व्यापारी आघाडीचे उत्तर प्रमुख दत्तराज छाजेड यांच्या हस्ते महेश गुगळे यांना देण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष ॲड.अभय आगरकर, जिल्हा सरचिटणीस सचिन पारखी, प्रशांत मुथा, महेश नामदे आदींसह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.



अहिल्यानगर भाजपा व्यापारी आघाडीचे शहर जिल्हाध्यक्ष महेश गुगळे यांचा प्रदेश भाजपाकडून विशेष सन्मान करताना प्रदेश व्यापारी आघाडीचे उत्तर प्रमुख दत्तराज छाजेड.

यावेळी दत्तराज छाजेड म्हणाले, नगर शहर व्यापारी आघाडीच्या माध्यमातून शहराध्यक्ष महेश गुगळे यांनी पक्षाचे उत्कृष्ट काम केले आहे. प्रदेश भाजपा कडून देण्यात येणारे सर्व कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी व्यापारी आघाडीने करत व्यापारी वर्गात पक्षाचे काम वाढवले आहे. त्यांच्या या कार्याची दखल प्रदेश भाजपाकडून घेण्यात आली असून प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनी दिलेले सन्मानपत्र महेश गुगळे यांना प्रदान करताना आनंद होत आहे.

ॲड.अभय आगरकर म्हणाले, नगर शहर व्यापारी आघाडीने उत्कृष्ट काम करून दाखवले आहे. याबद्दल महेश गुगळे यांचे अभिनंदन. पक्षाचे निष्ठेने काम केल्यावर पक्ष कशी दखल घेतो याचे हे मूर्तिमंत उदाहरण आहे. अशा उत्कृष्ट काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या जीवावरच पक्ष आज उभा आहे.


यावेळी आभार मानताना महेश गुगळे म्हणाले, व्यापारी आघाडीचे सर्व पदाधिकारी तनमनधनाने व निष्ठेने पक्षाचे काम करत आहेत. व्यापारी आघाडी टीम वर्क द्वारे नगर शहरातील व्यापारी वर्गाशी संपर्क करून भाजपचे कार्य त्यांच्यापर्यंत पोहचवत आहे. याचा चांगला परिणाम नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये झाला आहे. प्रदेशकडून झालेला सन्मान हा प्रेरणादायी असून पुढील काळात अधिक जोमाने काम करण्याची उर्जा देणारा आहे.

यावेळी व्यापारी आघाडीचे सरचिटणीस हर्षल बोरा, उपाध्यक्ष नीरज राठोड, लक्ष्मिकांत तिवारी, संजय कांगला, सुरेश लालबागे, प्रशांत बुऱ्हाडे, रूपेश वर्मा, पंडित वाघमारे, बाबासाहेब सानप, करण ढापसे, महिला आघाडीच्या प्रिया जाणवे, ज्योती दांडगे, रेणुका करंदीकर, कालिंदी केसकर, सोनाली पाठक, पल्लवी जाधव, सुरेंद्र गांधी, सतीश शिंदे, विलास नंदी, बाळासाहेब गायकवाड, प्रवीण ढोणे, महेश तवले, अमित गटणे, करण भळगट, बाळासाहेब भुजबळ, अभि शिंदे, संतोष गांधी, ॲड. चंदन बारटक्के, ज्ञानेश्वर धिरडे, अनिल निकम, विशाल खैरे, सुनील तावरे, सागर शिंदे, गोकुळ काळे, ॲड. अविनाश साखला, डॉ. दर्शन करमाळकर, अशोक जगताप, ऋषिकेश अंबाडे व सचिन पळशीकर आदी उपस्थित होते.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चषक इंडिया ओपन रिपब्लिक कप कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत

# अहिल्यानगर येथील जे.के.डी. क्लासच्या विद्यार्थ्यांनी मिळविले विविध पदके

नगर – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चषक इंडियान ओपन रिपब्लिक कप कराटे चॅम्पियनशिप २०२५ ही स्पर्धा शहरात पार पडली. वाडिया पार्क क्रीडा संकुल येथे झालेल्या स्पर्धेत महाराष्ट्रासह इतर १५ राज्यातुन खेळाडूंचा सहभाग लाभला. या स्पर्धेत महाराष्ट्राला सलग दुसर्यांदा प्रथम चॅम्पियनशिप मिळाली. याचॅम्पियनशिपमिळण्याम ध्ये जे.के.डी.च्या विद्यार्थ्यांचा मोलाचा वाटा लाभला. या स्पर्धेत कुमिते व काता या दोन्ही प्रकारात खेळाडुंना पदके मिळाली.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चषक इंडिया ओपन रिपब्लिक कप कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत अहिल्यानगर येथील जे.के.डी. कराटे क्लासच्या विद्यार्थ्यांनी विविध पदके मिळवुन यश संपादन केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

यामध्ये सुवर्ण पदके :– श्रेया भोज, प्रगती गाडेकर, राजश्री झिंजुर्डे,एस्तर साळवे, पुनम गुंड (सुपर गोल्ड) शिवम मस्के, वरुण अढाव, अनय पागा, प्रणव फंदे, कार्तिक गुंड, अक्षरा नवले. लब्धी लुनिया.


रौप्य परके :–अनुष्का चौधरी, श्रुती सावकर, राघव लोटके, स्वस्तीक करमाळकर, रुद्र गुप्ता, जोएल वैराळ, विरा गोयल, ध्रुवी काकडे, राजनंदीनी बायड, जेसिका वैराळ,स्तुति करमाळकर, अक्षदा मस्के, प्राजक्ता नवले, जिया बाफना, लावण्या सब्बन.

कांस्य पदके, शिवांश शिंदे,रुपम गुंड,रोहन दराडे, समर्थ ताक, अनन्या भंडारी, तनुजा गुंड, निव्या गांधी, किर्ति घाडगे

वरील सर्व विदयार्थ्यांना प्रशिक्षक अशफाक शेख, मुनेश म्याना, निता शिंदे यांचे मार्गदर्शन लागले, तसेच निता शिंदे यांचे कोचेस प्रेक्षा जितेंद्र नहार, राधिका श्रीकांत शिंदे, ऋषिकेश धनंजय निंबाळकर, यश विजय घुगरे यांचे ही विद्यार्थांना मार्गदर्शन लाभले.

# श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलचे रेखा कला परिक्षेत यश

नगर – श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ आर्ट एज्युकेशन मुंबई २०२३–२४ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय रेखा कला परिक्षेत एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.



रेखा कला परिक्षेत श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

यामध्ये शाळेचे हर्षदा संतोष ढगे, जानवी अभिजीत भालेराव, साई विजय रसाळ, कृष्णाली अनिल शिंदे, काव्या मुकेश भांगडिया हे विद्यार्थी ए ग्रेडने उत्तीर्ण झाले आहेत, तर आठ विद्यार्थी बी ग्रेडमध्ये उत्तीर्ण झाले. या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेतील चित्रकला विभाग प्रमुख सौ.पूनम सचिन पानसरे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अशोक कानडे, एज्युकेशन डायरेक्टर नंदकिशोर भावसार, मुख्याध्यापक सौ. तनुजा लोंढे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# माऊंट लिटेरा झी स्कूल दौंड रोड, अरणगावमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

नगर – माऊंट लिटेरा झी स्कूल दौंड रोड, अरणगावमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून 'कलारत्न पुरस्कार' विजेते, कला क्षेत्रातील अशोक डोळसे उपस्थित होते. शाळेचे अध्यक्ष ॲड. सुनील लोटके व मुख्याध्यापिका प्रा. शैलजा लोटके यांनी स्वागत केले.

कार्यक्रमाची सुरुवात झेंडावंदनाने झाली. नंतर विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध परेड सादर केली. पाहुण्यांच्या हस्ते शाळेतील चित्र व कला प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. पालक व विद्यार्थ्यांनी त्याला प्रतिसाद दिला. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक करत त्यांचे अभिप्राय व्यक्त केले.

प्रा.शैलजा लोटके यांनी शाळेच्या आगामी उपक्रमांबद्दल माहिती दिली. त्यांनी सांगितले की, येणाऱ्या वर्षांपासून शाळेच्या कॅम्पसमध्ये गोदावरी करिअर अकॅडमीच्या सहकार्याने इयत्ता ५वीपासून विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबत मिलिटरी प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे, ज्यामुळे ते भारतीय सैन्य दलात सहभागी होऊ शकतील.



विद्यार्थ्यांनी नृत्य, Taekwondo प्रात्यक्षिके, देशभक्तिपर गीते व नाटके सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. मागील वर्षी इयत्ता १० वीमध्ये प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्याचा सन्मान श्रीमती नेहा लुनावत यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच वर्षभरात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे, अध्यक्ष सुनील लोटके व प्रा. शैलजा लोटके यांच्या हस्ते मेडल, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि ते म्हणाले की, प्रथम दर्शनीच शाळा आणि शाळेचा परिसर अत्यंत शांत, सुंदर आणि प्रसन्न वाटला. शिस्तप्रिय विद्यार्थ्यांची प्रयत्नपूर्वक केलेली प्रात्यक्षिके अतिशय जोश पूर्ण होती. नृत्य, नाटिका आणि खेळांची सुंदर प्रात्यक्षिके विद्यार्थी व शिक्षकांच्या एकत्रित प्रयत्नातून केलेले सादरीकरण प्रभावी होते. चित्रकला हस्तकला प्रदर्शनाचे उद्घाटन करतेवेळी तेथील सुंदर कलाकृती विद्यार्थ्यांच्या कल्पकतेची जाणीव करून देत होत्या. कलाशिक्षक श्री व सौ. प्रवीण नेटके यांच्या प्रयत्नातून साकारलेले कलाप्रदर्शन खरोखर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे होते. कलाशिक्षक आणि विद्यार्थी दोघांचेही अभिनंदन आणि शुभेच्छा.

ॲड. सुनील लोटके, प्रा. शैलजा लोटके यांनी शाळेची दिलेली माहिती व विद्यार्थ्यांसाठी करीत असलेले उपक्रम अद्वितीय होते. विस्तीर्ण ग्राउंड अनेक खेळांच्या सुविधा आणि कलात्मक दृष्टिकोन यामुळे भविष्यात शहराच्याजवळ सैनिकी प्रशिक्षण देणारी ही एकमेव शाळा असेल यात नक्कीच दुमत नाही. शैक्षणिक अभ्यासक्रमासोबत शेती व्यावसायिक प्रशिक्षण आणि आर्थिक नियोजनासंबंधी प्रशिक्षण देणारी, आपले मराठी पण जपणारी इंग्रजी माध्यमाची ही शाळा भविष्यात शिक्षण क्षेत्रात आपला स्वतःचा ब्रँड बनवेल ही शुभेच्छा.

वासिम शेख यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे शेवट वंदे मातरम् गीताने झाला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी योगदान दिले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# ‘भारतीय स्वत्वाचा शोध धर्मपाल विचार’वर आधारित मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे ३० जानेवारीला नगरमध्ये आयोजन

नगर – भारतीय स्वत्वाचा शोध धर्मपाल विचार या मार्गदर्शन पर कार्यक्रमाचे सावेडी येथील माऊली सभागृह येथे ३० जानेवारी रोजी सायंकाळी ५:३० ते ८:३० यावेळेत आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात भारताची परंपरा सांस्कृतिक अवलोकन या विषयावर सौ. संज्योत महाजन यांचे व्याख्यान, डेरेदार ज्ञानवृक्ष १८ व्या शतकातील भारतीय शिक्षण व्याख्याते सौ.वृषाली मांडे १८ व्या शतकातील भारतीय विज्ञान व तंत्रज्ञान या विषयावर सौ.अंजली दिवेकर या व्याख्यान देणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन लेखिका सौ. गौरी डोखले या करणार आहेत.

या कार्यक्रमासाठी प्रेरणा आणि मार्गदर्शन हे पद्म श्री पुरस्कार प्राप्त स्व.डॉ.प्रभाकर मांडे यांचे आहे. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पद्म श्री पुरस्कार प्राप्त, सिद्धहस्त लेखक गिरीश प्रभुणे तर प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव हे आहेत. तर या कार्यक्रमाचे प्रायोजक ऑप्टिमाइज्ड इंडिया यांच्या कडून करण्यात आले आहे. अशी माहिती संदीप महाजन यांनी दिली आहे.

ब्रिटीशपूर्व भारतातील गौरवपूर्ण इतिहास, विविध सांस्कृतिक परंपरा आणि पध्दती, भक्कम शिक्षण व्यवस्था तसेच आपल्याला ज्ञात नसलेले विज्ञान आणि तंत्रज्ञानातील कौशल्य उलगडण्याचा हा एक प्रयत्न आहे. ह्यासाठी परम राष्ट्रभक्त धर्मपाल यांच्या सखोल संशोधन आणि अपरिमित संकलनावर आधारित विचारांचा आधार घेतला आहे.

# अखंड दिव्य ज्योतीची शंभर वर्षाची गौरवशाली परंपरा

## हरिभाऊ डोळसे यांचे प्रतिपादन; हरिद्वारच्या ज्योतीचे सनातन धर्म सभा व विश्व हिंदू परिषदेच्या वतीने स्वागत



हरिद्वारच्या दिव्य अखंड ज्योतीचे सनातन धर्म सभा व विश्व हिंदू परिषदेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

नगर – हरिद्वार या तीर्थक्षेत्रावरून आलेल्या गायत्री परिवाराची शंभर वर्षाची दिव्य अखंड ज्योती रथयात्रेचा अहिल्यानगर येथे शुभारंभ करण्यात आला आहे. गुरुजींच्या जन्माशताब्दी वर्षानिमित्त गुरुजींनी शंभर वर्षांपूर्वी सुरू केलेल्या अखंड दिव्य ज्योतीची कलश यात्रा महाराष्ट्रात अहिल्यानगर येथे आलेली आहे. या शोभायात्रेचे स्वागत करून दर्शनाचा भाविकांनी लाभ घ्यावा. गायत्री परिवाराच्या अखंड दिव्य ज्योतीची शंभर वर्षाची गौरवशाली परंपरा आहे, असे प्रतिपादन गायत्री परिवाराचे नगर शाखेचे हरिभाऊ डोळसे यांनी केले आहे.

कलश यात्रेचे माळीवाडा येथील श्री विशाल गणेश देवस्थानचे महंत संगमनाथजी महाराज यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. गायत्री देवीची महाआरती करण्यात आली. याप्रसंगी सनातन धर्म सभेचे वेदमूर्ती दत्तोपंत पाठक यांनी पौरोहित्य केले. याप्रसंगी हरिभाऊ डोळसे, काशिनाथ मोडे, निसर्गसृष्टी गोपालन संस्थेचे खजिनदार गजेंद्र सोनवणे, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री शरद नगरकर, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अमोल भांबरकर, प्रकाश कोहिनकर, अंगद सहानी, नारायण पंडेल, प्रमोद वाळके, जयंत पाटील, गणेश रीसे, अजय मिसाळ, देविदास ढवळे, चर्मकार संघाचे शहराध्यक्ष रुपेश लोखंडे, चौपाटी कारंजा मित्र मंडळाचे अध्यक्ष महेश कुलकर्णी, अमोल भंडारे, वीरेंद्र शिंदे, अशोक जोशी बन्सी महाराज, मनोहर भाकरे, अनिल निकम, श्रीकांत नांदापूरकर आदी उपस्थित होते.

सनातन धर्मसभेचे वेदमूर्ती दत्तोपंत पाठक गुरुजी म्हणाले, आपण भाग्यवान आहोत. अखिल विश्वाच्या गायत्री परिवाराची अखंड ज्योतीची शोभायात्रा अहिल्यानगर येथे आली आहे. कुंभ पर्वकाळात अखंड दिव्य ज्योतीच्या रूपाने गंगा आपल्या दारात आली आहे. तसेच संत महंत ही या यात्रेत सहभागी झाले आहेत. या गायत्री परिवाराच्या अखंड दिव्य ज्योतीचे दर्शनाचा लाभ अहिल्यानगर वासीयांनी घ्यावा व स्वागत करावे.

शरदराव नगरकर म्हणाले, विश्व हिंदू परिषदेच्या वतीने गायत्री परिवाराच्या अखंड ज्योतीचे शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले आहे.

रुपेश लोखंडे म्हणाले, अहिल्यानगरच्या विविध भागात गायत्री परिवाराच्या अखंड ज्योतीचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले आहे. या अखंड दिव्य ज्योतीचा सकल विश्वात ज्ञानाचा प्रकाश पडत राहिल.

अखंड दिव्या ज्योतीची मिरवणूक माळीवाडा येथून कापड बाजार, तेलीखुंट चौक, चितळे रोड, येथून यात्रेचा समारोप गायत्री मंदिरात करण्यात आला. गायत्री मंदिरात सनातन धर्मसभेच्या वतीने गायत्री परिवाराचे स्वागत करण्यात आले.

# छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालयात ३१ जानेवारी रोजी ‘भरती मेळावा’

नगर – नेप्ती येथील श्री छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये ३१ जानेवारी रोजी भरती मेळावा होणार असून यामध्ये जवळपास २५ इंडस्ट्रीज विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन त्यांना रोजगार उपलब्ध करून देणार आहेत. बोर्ड ऑफ प्रेंतिसेशिप ट्रेनिंग (बोट) आणि श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय नेप्ती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या भरती मेळाव्यामध्ये अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, कला, विज्ञान, वाणिज्य, संगणक विज्ञान, औद्योगिक प्रशिक्षण अशा क्षेत्रांतील विद्यार्थ्यांसाठी संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

महाविद्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामार्फत या रोजगार मेळाव्याचे आयोजन केले गेले असून या भरती मेळाव्यामध्ये अहमदनगर, पुणे, रांजणगाव, सुपा, चाकण यांसारख्या एमआयडीसी मधून विविध कंपनी सहभागी होणार असून यामध्ये व्ही आर डी ई, क्रॉम्प्टन ग्रीव्हज, एपिटोम कंपोनंट लिमिटेड, एक्साइड इंडस्ट्रीज, क्लासिक व्हील्स इत्यादी बहुराष्ट्रीय कंपनीचा देखील सहभागी असणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी दिली असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या रोजगार उपलब्धतेच्या संधीचा लाभ घ्यावा अशी अवाहन विद्यार्थ्यांना केले आहे. बोर्ड ऑफ प्रेंतिसेशिप ट्रेनिंग (बोट) (वेस्टर्न रिजन), मुंबई चे उपसंचालक एन.एन. वडोदे हे या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभणार आहेत. हा रोजगार मेळावा यशस्वी होण्यासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. एस. एम. वाळके तसेच समन्वयक प्रा. ए आर माने, प्रा. एम पी आठरे, प्रा. जी बी साळुंके, प्रा. पी. डी. कोतकर तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मेहनत घेत आहेत. ज्या विद्यार्थ्यांना या भरती मेळाव्यासाठी आपले नाव नोंदवायचे असेल अशा विद्यार्थ्यांनी ३१ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता महाविद्यालयामध्ये उपस्थित रहावे.

संस्थास्तरावरून अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंतराव वाघ, खजिनदारड. दीपलक्ष्मी म्हसे तसेच संस्था सदस्य–पदाधिकारी यांनी होणाऱ्या भरती मेळाव्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अहिल्यानगरमध्ये क्षयरोगमुक्त अभियान राबविणार

## आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन; मनपा आरोग्य विभागाच्यावतीने जिल्हा हमालपंचायत मधील माथाडी कामगारांची आरोग्य तपासणी



मनपा आरोग्य विभागाच्यावतीने जिल्हा हमाल पंचायत येथे झालेल्या माथाडी कामगार आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते करण्यात आले.

नगर – मनपाच्या आरोग्य विभागाच्या वतीने राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाअंतर्गत १०० दिवसीय पंतप्रधानमंत्री मुक्त भारत अभियान राबविण्यात आले. क्षयरोगमुक्त नगर करण्यासाठी शासनाच्या अभियानाच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आल्याचे मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले. तसेच यावेळी निश्चय वाहनाचेही उद्घाटन आयुक्त यांच्या हस्ते करण्यात आले.

केंद्र शासनाकडून यावेळी डॉ. ललित महेंद्र जागतिक आरोग्य सल्लागार, डॉ. सुवर्णा रामटेके जागतिक आरोग्य सल्लागार, डॉ.करण नागपूरकर यावेळी त्यांनी विविध आरोग्य केंद्रांना भेट दिली असता कामकाज क्षयरोग विभागाचे चांगले असल्याचे सांगितले. १०० दिवशीय मोहिमेमध्ये ८४ रुग्ण आढळले आहेत.

मनपा आरोग्य विभाग च्या वतीने जिल्हा हमाल पंचायत येथे झालेल्या माथाडी कामगार आरोग्य तपासणी शिबिराचे उदघाटन आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले, उपायुक्त विजयकुमार मुंडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी सतीश राजुरकर, डॉ. साहिल शेख, संजय घुले, हमाल पंचायतचे उपाध्यक्ष गोविंद सांगळे, शेख रज्जाक शेखलाल, माथाडी पतसंस्था चेअरमन रविंद्र भोसले, बहिरू कोतकर, सचिन ठुबे, संजय महापुरे, बाळासाहेब वडागळे, लक्समन वायभासे, नंदू डहाणे, डॉ. कवळे, मंदा सूर्यवंशी, रत्नाबाई आजबे आदींसह हमाल माथाडी कामगार या कार्यक्रमासाठी उपस्थित होते

यावेळी बोलताना आयुक्त यशवंत डांगे म्हणाले कि क्षयरोग हा १०० टक्के बरा होऊ शकतो माथाडी कामगार हे सतत कष्टाची कामे करत असतात त्यांना त्यांच्या आरोग्याकडे व्यवस्थित लक्ष देता यात नाही म्हणून केंद्र सरकार च्या वतीने या अभियानचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्यमातून मोफत एक्सरे काढण्यात येतो तसेच जिल्हा हमाल पंचायत ही सुद्धा माथाडी कामगार यांच्या साठी विविध उपक्रम राबवून त्यांचे आरोग्य कसे अबादित राहील या कडे लक्ष देत असते तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजना माथाडी कामगार यांच्यासाठी आपण यापुढेही राबवू असे आयुक्त डांगे म्हणाले.

अविनाश घुले म्हणाले कि माथाडी कामगार यांचे आरोग्य चांगले रहावे म्हणून त्यांनी आपल्या आरोग्याची तपासणी ही वेळोवेळी केली पाहिजे कारण माथाडी कामगार हा सर्वात जास्त कष्टाची कामे करत असतो आज मनपाच्या आरोग्य विभागाच्यावतीने हे शिबीर राबवून काम गारांना जागेवर सर्व तपासणी ही मोफत करून मिळणार आहे याचा लाभ माथाडी कामगार व त्यांच्या परिवाराने घेण्याचे आवाहन घुले यांनी केले तसेच भविष्यात ज्या काही शासनाच्या आरोग्य विषयक योजना असतील त्या सर्व योजनांचा लाभ आमच्या माथाडी कामगाराला मिळाला पाहिजे असे आयुक्त डांगे यांचेकडे मागणी केली. या शिबिरामध्ये अत्याधुनिक टेक्नॉलॉजीच्या सर्व मशीन या ठिकाणी तपासणीसाठीची व्यव्यस्था करण्यात आले होती. सूत्रसंचालन संजय महापुरे यांनी केले तर आभार डॉ. आयेशा शेख यांनी मानले. तसेच तपासणीसाठी डॉ. आयेशा शेख, डॉ.विनय शेळके, डॉ.अनुराधा इथापे, डॉ. शर्वरी काटे यांची टीम होती.

# ओंकार आदिनाद आयोजित ‘स्वतंत्रते भगवती’ मैफलीने रसिक मंत्रमुग्ध

## भिंगारमध्ये प्रजासत्ताकदिनी राष्ट्रभक्तीपर गीतांचे गायन



ओंकार आदिनाद आयोजित ’स्वतंत्रते भगवती’ मैफलीने रसिक मंत्रमुग्ध झाले,

नगर – ओंकार संगीत निकेतन प्रस्तुत ’स्वतंत्रते भगवती’ या प्रजासत्ताक दिनी झालेल्या राष्ट्रभक्तीपर गीतांनी रसिक मंत्रमुग्ध झाले. ओंकार आदिनाद कला प्रतिष्ठान संस्थेतर्फे सादर करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला विद्यालयाचे संचालक संगीता देऊळगांवकर आणि ओंकार देऊळगांवकर यांचे मार्गदर्शन लाभले. स्वर्ग से सुंदर देश हमारा, हा देश माझा, आम्ही पुत्र अमृताचे, हे राष्ट्र देवतांचे, बलसागर भारत होवो, जहा डाल डाल पर सोने की चिडिया, जयतु जननी, ए वतन मेरे वतन, जयोस्तुते, वंदे मातरम् अशी अनेक लोकप्रिय आणि काही नवीन देशभक्तीपर गीते सादर करण्यात आली. भिंगार शाखेतील भार्गव देऊळगांवकर, अश्रीज्ञा कुसळकर, पलक गांधी, राधिका जगताप, स्वराली गावडे, श्रेयांश जोशी, रेहांश जोशी, गौरी सुतार, मोक्षदा मोहिते, सहीला कोकणे, राधिका कोल्हे, पूर्वा लकारे, मोहिका भंडारी, प्रेम मजुकर, वैष्णवी खुरपे, गीतांजली सगम, रुपाली केदारे, माधुरी मेढे, अंकित पवार, शिवम मिरजे तर दरेवाडी शाखेतील गायत्री धनलगडे, सानिका औटे, ईश्वरी ननवरे, श्रद्धा गौड, पायल राऊत, श्रद्धा शिंदे, सांस्कृती कोठूळे, वैष्णवी – वैभवी चव्हाण, सानवी मुरूमकर, स्टेफी केल, प्रबुद्ध शिंदे, श्रीराम खांदवे, मयुरी ओमसे या विद्यार्थ्यांनी समर्थपणे देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले. त्यांना उत्तम अशी तबला साथ सुपर्ण प्रताप, वैष्णवी कोल्हे, अनुज दरवडे यांनी केली तर कीबोर्ड साथ दर्शन जावळे व गायत्री धनलगडे तर गीतांजली सगम व मीनाक्षी सरोदे यांनी तालवाद्याची साथ केली.

लहानशा वैभवी चव्हाण ने प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगून, आपल्या वक्तृत्वाने उपस्थितांची मने जिंकली.

या सर्व गीतांचे उत्कृष्ट असे सूत्रसंचालन जान्हवी देऊळगांवकर यांनी केले. या कार्यक्रमाला शरद देशपांडे, न्यायाधीश, कामगार न्यायालय यांची प्रमुख उपस्थिती असून त्यांनी मुलांना भाषणातून देशभक्तीचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमाला डॉ. सुरेश सारडा, ज्योती देशपांडे, सचिन कस्तुरे, अशोक डोंगरे, डॉ. रितू नाथ, श्रद्धा – अनिकेत देऊळगांवकर, संस्थेचे अध्यक्ष अविनाश देऊळगांवकर आणि सर्व पालक वृंद उपस्थित होता. ध्वनी व्यवस्थापन प्रथमेश गव्हाणे, संकेत शिंदे या विद्यार्थ्यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अजित भोसले, आयुष खकाळ आदींनी परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रमासाठी चौंडेश्वरी मंदिर संस्थानच्या विश्वस्तांचे सहकार्य लाभले.

# प्रियदर्शनी पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेत यश संपादन



प्रियदर्शनी पब्लिक स्कूलच्या राजवीर तेजी या खेळाडूने राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेत यश मिळविल्याबद्दल त्याचा सत्कार करताना बाळासाहेब खोमणे सर, प्राचार्य अंजली बोधक, उपमुख्यध्यापक अमोल घोरपडे, पर्यवेक्षिका अनिता थापा, प्रशिक्षक आशिष भिंगारदिवे.

नगर – भारत सरकार युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयद्वारे क्रीडा प्रोत्साहन संघटना मान्यताप्राप्त स्टेयर्स फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा १७ जानेवारी ते १९ जानेवारी रोजी बेल्हेकर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट भानस हिवरे, जि. अहिल्यानगर येथे पार पडल्या. या स्पर्धेत भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या १४ वर्ष वयोगटातील राजवीर राहुल तेजी या खेळाडूची अहिल्यानगर जिल्हा संघामध्ये निवड झाली. या राज्यस्तरीय सामन्यांमध्ये या खेळाडूने उत्कृष्ट कामगिरी केली व राज्यस्तरीय स्पर्धेत अहिल्यानगर जिल्हा संघास प्रथम क्रमांक मिळवून दिला.

या यशाबद्दल शाळेचे संस्थापक बाळासाहेब खोमणे सर, प्राचार्य अंजली बोधक, उपमुख्यध्यापक अमोल घोरपडे, पर्यवेक्षिका अनिता थापा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या या सर्व खेळाडूंना शाळेचे फुटबॉलचे प्रशिक्षक आशिष भिंगारदिवे यांचे मार्गदर्शन लाभले.


## जाहीर नोटीस

**तमाम लोकांस विशेषतः मौजे चाहुराणा बुद्रुक ता. नगर जि. अहमदनगर येथील लोकांना कळविण्यात येते की, मौजे चाहुराणा येथील मिळकत**

**१) सर्व्हे नं. ५२/२/१ पैकी क्षेत्र २४०० चौ.मी. या मिळकतीचे पूर्व - रस्ता, दक्षिण - नगर पुणे रोड, पश्चिम - ५२/२/१ पैकी, उत्तर - शिव**

**२) सर्व्हे नं. १३३/३ पैकी क्षेत्र ३००० चौ.मी. या मिळकतीचे पुर्वेस - १३३/३ पैकी, दक्षिण - सौरभ कॉम्प्लेक्स, पश्चिम - १३३/३ पैकी, उत्तर- रस्ता**

**वर नमुद नं. १ पैकी सर्व्हे नं. ५२/२/१ ही मिळकत आमचे अशिलाने रजि. खरेदीखताने सन १९९२ मध्ये खरेदी घेतलेली असुन प्रत्यक्ष ताब्यात आहे. दरम्यान सदर मिळकतीबाबत श्री. पवार व झारेकरी यांनी दरखास्त दाखल केलेली होती, त्यामुळे दरखास्तीमध्ये वाटपाचा ताब्याबाबत कोणताही वाद राहु नये म्हणुन वर नमुद केलेल्या मिळकतीबाबत त्यांनीही आमचे अशिलास संमतीपत्र व समजुतीचा करारनामा लिहुन दिलेला आहे. आमच्या अशिलाचा सदर मिळकतीवर खरेदीखतापासुन प्रत्यक्ष ताबा आहे. तर दुसरी मिळकत सर्व्हे नं. १३३/३ या मिळकती संदर्भात आमचे अशिलाच्या हक्कात हसन बाबु झारेकरी यांनी फार मोठी रक्कम स्विकारुन साठेखत लिहुन दिलेले आहे. अशा प्रकारे वर नमुद केलेल्या मिळकतीवर आमचे अशिलाचा हक्क हितसंबंध असुन त्याप्रमाणे कब्जा आहे. तथापि वाटप दरखास्ती मध्ये मोजणी नुसार सदर मिळकती संदर्भात मिसाळ, झारेकरी व श्री. पवार यांनी दरम्यान काही खरेदी विक्री बाबतचे व्यवहाराची चर्चा सुरु केलेली आहे तथापि वर नमुद केलेल्या मिळकतीबाबत श्री. पवार मिसाळ अथवा झारेकरी यांचा कोणत्याही प्रकारचा हक्क संबंध नाही, त्यांचे बरोबर कुणीही वर नमुद केलेल्या क्षेत्राबाबत खरेदी विक्री साठेखत अथवा अन्य प्रकारचा हस्तांतराचा करार करु नये, याउपरही केल्यास व्यवहार करणारास मालकी हक्क व कब्जा मिळणार नाही याची नोंद घ्यावी तसेच कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.**

**ता. २९/०१/२०२५**
**३८७६, काकडे सदन,**
**नांगरे गल्ली अहमदनगर**
**मो. नं. ९४२२३३३३३९**

**डॉ. प्रकाश कांकरीया**
**डॉ. सौ. सुधा कांकरीया यांचेकरीता**
**ॲड. सौरभ सुभाष काकडे**
एल. एल. एम
ॲडव्होकेट




एकदंत कॉलनीत श्री एकदंत गणेश मंदीराच्यावतीने आयोजित मोफत शिबीरास प्रतिसाद मिळाला.

# श्री एकदंत गणेश मंडळ आयोजित शिबीरास प्रतिसाद

नगर – श्री गणेश जयंती निमित्त दातरंगे मळा येथील एकदंत कॉलनीत श्री एकदंत गणेश मंदीराच्यावतीने आयोजित मोफत नेत्र तपासणी, मोतिबिंदू शस्त्रक्रिया, आरोग्य तपासणी, दंत तपासणी व मोफत औषध वाटप शिबीरास प्रतिसाद मिळाला. यावेळी डॉ.प्रशांत सुरकुटला, डॉ.शाम गुरुड, डॉ.प्रतिक्षा कोडम, डॉ.आनंद बोज्ञा, शुभम बोज्ञा, डॉ.योगेश मंचे, निता मंचे, डॉ.महेश वाघ, गुफिक फार्मसीचे गणेश भवर आदींनी रुग्णांची तपासणी केली.

डॉ.योगश मंचे हणाले कि, शिबिरातही चांगल्या शस्त्रक्रिया होतात हे गरजू रुग्णांना समजल्याने शिबीरांचे महत्व लक्षात आले, चांगला प्रतिसाद प्रत्येक शिबीरास लाभत आहे. श्री एकदंत गणेश मंडळ हे २१ वर्षापासून आरोग्य सेवा गरजूंना देत आहे. मंडळाचे हे कार्य गरजूंसाठी फायद्याचे असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच डॉ.प्रतिक्षा कोडम, डॉ.प्रशांत सुरकुटला, डॉ.रत्ना बल्लाळ, डॉ.शाम गुरुड, डॉ.गणेश भवर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

प्रास्तविकात मंडळाचे स्वाती गाजेंगी म्हणाले कि, महागाईच्या काळात आरोग्याकडे सर्वसामान्य नागरीक दुर्लक्ष करतात. त्यामुळे मोठा आजारा होऊन विविध संकटांना सामोरे जावे लागते. अशा गरजु रुणांसाठी गणेश जयंतीनिमित्त मंडळाच्यावतीने एक प्रयत्न म्हणून हे मोफत आरोग्य तपासणी शिबीरे घेण्यात येतात. जेणे करुन गरजु रुग्णांनाचे आरोग्य चांगले राहिल असे सांगुन जयंती उत्सावानिमित्त घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

या आरोग्य शिबीरात डॉ.शाम गरुड, डॉ.प्रशांत सुरकुटला, डॉ. रत्ना बल्लाळ यांनी ३७६ रुग्णांची आरोग्य तपासणी करुन योग्य ते मार्गदर्शन केले. नेत्र तपासणी शिबिरात ८२ रुग्णांनी तपासणी होऊन १८ रुग्ण मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी पाठविले. नेत्र शिबीरात एच.व्ही. देसाई रुग्णालयाचे डॉ.आनंद बोज्ञा व शुभम बोज्ञा यांनी रुग्णांनी नेत्र व मोतीबिंदू तपासणी केली. दंत तपासणी शिबीरात डॉ.प्रतिक्षा कोडम यांनी १९ रुणांची तपासणी केली. यंदा प्रथमच आयुर्वेदिक चिकित्सा शिबीराचे आयोजन करण्यात आले. डॉ.योगेश मंचे यांनी आयुर्वेदिक चिकित्सेव्दारे रुग्णांना मार्गदर्शन करुन मोफत आयुर्वेदिक औषधोपचार केले. यावेळी निता मंचे, डॉ.महेश वाघ त्यांना सहकार्य लाभले. गुफिक फार्मसीचे गणेश भवर आणि सहकारी यांनी वैद्यकिय तपासणी सोबत अस्थी घनता तपासणी ही केली. तसेच मोफत औषधोपचार केले. या शिबीरात परिसरातील विविध भागातील ४७० रुग्णांनी सहभाग घेतला.

शिबीर यशस्वीतेसाठी मंडळाचे कार्यकर्ते व एकदंत महिला बचत गट सदस्यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन रोशन सुंकी यांनी केले. किर्ती इराबत्तीन यांनी आभार मानले.


## जाहीर निवेदन

**तमाम लोकास व सर्व शासकिय कार्यालय यांना या जाहीर पत्रकाद्वारे कळविण्यात येते की पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष व माजी विश्वस्त यांची संस्थेच्या दिनांक २१/११/२०२४ रोजीच्या सभेतील विषय क्रमांक ३ व ठराव क्रमांक ३ नुसार त्यांची संस्थेच्या विश्वस्त पदावरुन व सदस्य पदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे.**

**शरद क्यादर ही व्यक्ती संस्थेच्या हिता विरुद्ध विघातक कृत्य करत होती या कारणास्तव संस्थेच्या घटनेनुसार संस्थेच्या हितासाठी शरद क्यादर यांची बहुमतांनी हकालपट्टी करण्यात आली आहे. या बाबत त्यांच्याशी वेळोवेळी पत्रव्यवहार करून माहिती देण्यात आली व हकालपट्टी नंतर सविस्तर माहिती दैनिक वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध करण्यात आली होती. हकालपट्टी झाल्याचा राग मनात धरून शरद लिंगप्पा क्यादर ही नामक व्यक्ती संस्थेची व संचालकांची बदनामी करणे हेतू कुटील कारस्थान करत आहे व संस्थेचे बनावट शिक्के व लेटरपॅड तयार करून स्वतः अध्यक्ष आहे हे भासवून तसे सही करून काही शासकिय कार्यालयात पत्र व्यवहार करत आहे व सोशलमीडिया मध्ये सुद्धा प्रसिद्ध करत आहे. या पत्रकाद्वारे तमाम लोकांस व सर्व शासकिय कार्यालयास कळविण्यात येते की शरद लिंगप्पा क्यादर रा. बागडपट्टी अहिल्यानगर यांचा व पद्मशाली विद्या प्रसारक मंडळ या संस्थेशी कुठलाही संबंध नाही. लवकरच त्यांच्यावर बनावट लेटर पॅड व शिक्के बनवण्याबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे परंतु काही सोशल मीडियावर शरद क्यादर यांनी पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाच्या सारखी बनावट लेटर पॅड व शिक्का करून या बनावट शिक्क्याचा दुरुपयोग गैरवापर करून संस्थेची बदनामी होईल असे कृत्य करत आहे.**

**या जाहीर निवेदन पत्रकाद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, शरद लिंगप्पा क्यादर यांचा व यांनी केलेला कुठलाही पत्रव्यवहाराचा इतर बाबींचा संस्थेशी संबंध नाही.**

**जनतेची व शासकिय कार्यालयाची कुठलीही फसवणुक व दिशाभूल होऊ नये यासाठी हे जाहीर पत्रक प्रसिद्ध करत आहोत.**

**सचिव**
**श्री. विनायक गुडेवार**
पद्मशाली विद्या प्रसारक मंडळ,
**नोंदणी क्रमांक A-55**
गांधी मैदान, अहिल्यानगर.

# कॅलिडोस्कोप

लंडनमध्ये राहणारी मुलगी खूप हुशार आहे. तिचा मेंदू आईनस्टाईन, स्टिफन हॉकिंग्ज अशा थोर शास्त्रज्ञांपेक्षाही अधिक तल्लख आहे. अनुष्का दीक्षित हे तिचं नाव आहे. तिचा आयक्यू म्हणजेच बुध्यांक १६२ आहे. तिने मेन्सा बुध्यांक चाचणी दिली होती. यात अनुष्काने सर्वाधिक गुण मिळवले. आईनस्टाईन, हॉकिंग्ज यांचा बुध्यांक १६० असल्याचं बोललं जातं. अनुष्काचा बुध्यांक त्यांच्यापेक्षा दोनने अधिक आहे. अनुष्काने फक्त ४० मिनिटांमध्ये सर्व पाढे पाठ केले होते. अनुष्का सहा महिन्यांची


## लिटिल जिनियस अनुष्का!



असल्यापासूनच बोलू लागली, असं तिची आई सांगते. टीव्हीवरच्या जाहिरातींमधल्या ओळी ती म्हणू लागली होती. लहानपणापासूनच तिच्या तल्लख बुद्धीचा प्रत्यय अनेकांना आला. एक वर्षाची असतानाच तिने जगातले देश आणि त्यांच्या राजधान्यांची नावं लक्षात ठेवायला सुरूवात केली.

अनुष्का आई-वडिलांसोबत लंडनला रहाते. युनिव्हर्सिटी ऑफ इस्ट लंडनतर्फे या बुध्यांक चाचणीचं आयोजन करण्यात आलं होतं. या चाचणीत सहभागी होणारी अनुष्का ही सर्वात लहान वयाची स्पर्धक होती.

अनुष्काला डॉक्टर व्हायचं आहे.



## देवाच्या दारी आणखी किती वळी?

भाविकांची हुल्लडबाजी आणि बालाजी मंदिर प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे बुधवारी झालेल्या चेंगराचेंगरीत तिरुमला येथे सहा भाविकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. प्रत्येक शहरांमध्ये प्रति बालाजी मंदिरे असताना इतक्या गर्दीच्यावेळी जाऊन जीव धोक्यात घालण्याची गरज काय, हा प्रश्न भाविकांनी आता स्वतः लाच विचारावा.

**दुर्दैवी घटना कशामुळे घडली?**

भाविकांना मंदिराजवळच्या बैरागी पट्टिडा पार्कमध्ये रांगेत उभे राहण्यास सांगण्यात आले होते, तिथे ४००० हून अधिक भाविकांची गर्दी होती. साहजिकच काउंटर उघडल्यावर अरुंद वाटेने पुढे जाण्याच्या शर्यतीत गोंधळ उडाला आणि लोक पळताना एकमेकांना तुडवत गेले. या निमित्ताने सातारा जिल्ह्यातील मांढरदेवी यात्रेत २००५ साली आग आणि चेंगराचेंगरीत ३४० जणांचा मृत्यू झाला होता. महाराष्ट्राला ती ह्रदय हेलावून टाकणारी दुर्घटना आठवली.

**मंदिर प्रशासनाचा खुलासा**

वास्तविक मंदिर प्रशासनाच्या मते, दर्शनासाठी तिकिट टोकन घेण्यासाठी ९१ काउंटर उघडण्यात आले होते. ही संख्या पुरेशी होती आणि केवळ भाविकांच्या हुल्लडबाजीमुळे ही दुर्दैवी घटना घडली. रांगेत उभ्या असलेल्या एका महिलेची प्रकृती अचानक बिघडली. यानंतर, संबंधित महिलेला रुग्णालयात नेण्यासाठी दरवाजा उघडताच चेंगराचेंगरी झाली. पण दुर्घटनेचे व्हिडिओ पाहता, भाविकांना टोकन काउंटरजवळ जायला ठेवलेली अरुंद जागा हे दुर्घटनेचे मूळ कारण वाटते. शिवाय ४००० हून अधिक भाविक एकाचवेळी टोकन घेण्यासाठी एक दिवस आधीपासून रांगेत उभे राहिले होते, हा पण मंदिर प्रशासनाचा हलगर्जीपणा आहे.

**वारंवार अशा घटना घडतात कशा?**

१. सार्वजनिक सुट्ट्यांमुळे अशा प्रसिध्द मंदिरात एकावेळी हजारोंच्या संख्येने भाविक जमा होतात, त्यावर मंदिर प्रशासनाचा अंकुश नाही.

२. प्रसिद्ध मंदिरांनी नवलौकीकाच्या मानाने भाविकांना बाकी सुविधा दिल्या, पण दर्शन प्रक्रिया येत कुठलीच सुसूत्रता आढळत नाही. यापूर्वी इंदूरच्या स्नेहनगर येथील बेलेश्वर मंदिरात विहिरीचे छत गर्दीचा दबाव सहन करू न शकल्याने वर बसलेल्या भाविकांसह खोल विहिरीत पडले.

३. राजकीय नेते, चित्रपट सृष्टीतील प्रसिध्द कलाकार यांच्या भेटीमुळे मंदिरात भाविकांची गर्दी वाढते आणि अशा घटना घडतात.

४. अति उत्साही आणि हुल्लडबाज भाविकांमुळे मुद्दाम असे प्रकार घडवून आणले जातात.

५. भाविकांमध्ये झालेल्या अफरातफरीचा फायदा घेण्याचा उद्देश असलेल्या चोरट्यांचाही यात सहभाग असतो.

६. दर्शन प्रकारामुळे तास न् तास तातकळत थांबलेल्या भाविकांचा उद्रेक होतो.

**प्रशासनाच्या कार्यात सुसूत्रता कधी येणार?**

अशा दुर्घटना घडल्यावर, मृत भाविकांच्या कुटुंबीयांना तुटपुंजी आर्थिक मदत, जखमींना उपचार देण्यापलीकडे राज्याचे मुख्यमंत्री असतील किंवा, सत्तारूढ पक्षाचे नेते असतील, दुसरे काहीही करत नाहीत. एका मंदिराचा असा दुर्दैवी अनुभव पाहून दुसऱ्या मंदिराचे व्यवस्थापन, दर्शन प्रकि येत सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने काहीही बदल करताना दिसत नाही.

**अशा दुर्दैवी घटना कशा टाळता येतील?**

१. बऱ्याचदा धार्मिक स्थळांवर राजकीय हस्तक्षेप आणि त्यांचा राजकीय फायद्यासाठी वापर बंद होणे गरजेचे आहे. तर अशा ठिकाणी कडक नियम लागू करता येतील.

२. नियमावली, मार्गदर्शक तत्वे तंतोतंत पाळली गेली तर अशा दुर्घटना टाळता येतील. धार्मिक स्थळी होणाऱ्या गर्दीच्या कार्यक मांमध्ये या प्रकारच्या घटना थांबवण्यासाठी मार्गदर्शक तत्वे आहेत, कडक नियम आहेत त्यांची काटेकोर अंमलबजावणी व्यवस्थापनाकडून झाली पाहिजे.

३. मंदिर प्रशासनाच्या प्रभावी नियोजनाद्वारे, पुरेसे कार्यक्षम कर्मचारी आणि स्वयंसेवकांद्वारे अशा धार्मिक स्थळांची दर्शन व्यवस्था निर्धोकपणे राबवता येईल.

मंदिर प्रशासनाच्या व्यवस्थेत बाधा न आणता धार्मिक स्थळी भक्तिभावाने, आणि शांततेच्या मार्गाने दर्शन प्रकि येत आपलाही सहभाग दाखवणे ही आलेल्या भाविकांची खरी जबाबदारी आहे. ती पाळली तर सगळ्याच यंत्रणांवरचा ताण कमी होऊन त्या भविकांच्याच सेवेसाठी अधिक प्रभावीपणे काम करू शकतील.

## पाचशे किलोचे कडे पडले जमिनीवर

अनेक वेळा अशा काही घटना घडतात ज्याची कोणी कल्पनाही केली नसेल! अशीच एक घटना उघडकीस आली. केनियाच्या दक्षिणेकडील माकुएनी काउंटीमधील मुकुकू गावात पाचशे किलो वजनाचे धातूचे कडे जमिनीवर पडले. त्याचा व्यास अंदाजे ८ फूट (२.५ मीटर) आहे आणि त्याचे वजन अंदाजे १,१०० पौंड (५०० किलोग्रॅम) आहे.

केनिया स्पेस एजन्सीने हे कडे आणि त्याचा अवशेष ताब्यात घेतला. हा आकार पाहून 'हार्वर्ड स्मिथसोनियन सेंटर फॉर ॲस्ट्रोफिजिक्स'चे तज्ज्ञ म्हणतात, की ते विमानाचा भाग असू शकते. 'यूएस स्पेस फोर्स'च्या माहितीनुसार, त्यांना या रॉकेटचा ढिगारा रशियातील बैकल सरोवरात पुन्हा शिरताना दिसला; मात्र ते याबाबत स्पष्टपणे काहीही सांगू शकत नाहीत. बहुतांश संशोधनातून हा त्याच रॉकेटचा ढिगारा असल्याचे समोर आले आहे. यानंतर केनिया स्पेस एजन्सीने मुकुकू गावातील रहिवासी, स्थानिक नेते आणि मीडियाचे आभार मानले. केनिया स्पेस एजन्सी आणि इतर आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांद्वारे तपास केला जात आहे आणि केनियातील घटना अवकाशातील ढिगाऱ्यांच्या आव्हानाकडे निर्देश करते.



मानवाने अवकाशात पाठवलेल्या ढिगाऱ्यांचे महत्त्व अधोरेखित केले. अंतराळातील ढिगाऱ्यांच्या वाढत्या प्रमाणामुळे पृथ्वी आणि कक्षीय पर्यावरणाला महत्त्वपूर्ण धोका निर्माण झाला आहे.



## लाच घेतलेल्या नोटा उंदरांनी चाटल्याचा आरोप!


उत्तर प्रदेशातील बरेली येथून एक धक्कादायक घटना घडली. एका जमादारावर लाच म्हणून घेतलेल्या नोटांच्या जागी इतर नोटा न्यायालयात सादर केल्याचा आरोप आहे. कारण विचारले असता त्याने चलनी नोटा उंदराने चाटल्याचा आरोप केला.

या संपूर्ण प्रकरणाची माहिती अधिकाऱ्यांना कळताच त्यांनी संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली आणि जम ादारावर गुन्हा दाखल करण्यात आला. हे प्रकरण बरेली जिल्ह्यातील नवाबगंज पोलिस ठाण्यातील आहेत. येथे तैनात असलेले जमादार उदयवीर सिंह यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ फ ेब्रुवारी २०२१ रोजी उत्तर प्रदेश पोलिसांच्या लाचलुचपत प्रतिबंधक संस्थेने नवाबगंज तहसीलमध्ये एका अकाउंटंटला दहा हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले होते. लाच म्हणून मिळालेल्या वीस आणि पाचशे रुपयांच्या नोटांव्यतिरिक्त, टीमने आठ हजार ३६१ रुपये आणि एक मोबाईल फोन, आधार कार्ड आणि पॅन कार्डदेखील आरोपींकडून जप्त केले.

लाचेची रक्कम आणि वस्तू उदयवीर सिंह यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्या. नंतर न्यायालयाच्या आदेशानुसार रोख रक्कम व इतर वस्तू परत करण्यात आल्या. लाचेच्या नोटा नवाबगंज पोलिस ठाण्यात जमा करण्यात आल्या. खटल्यादरम्यान, जमादाराने लाचेच्या मूळ नोटा कोर्टात हजर केल्या नाहीत.

याचे कारण विचारले असता, त्याने मूळ नोटा उंदरांनी चाटल्याचा आरोप केला. अतिरिक्त पोलिस अधीक्षक मुकेश चंद्र मिश्रा म्हणाले, की जमादाराने आरोपींना फायदा मिळवून देण्यासाठी हे गुन्हेगारी कृत्य जाणूनबुजून केले. जमादाराविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला.

## खुनाबद्दल शिक्षा? पण खून झाला, तो जिवंत!



बिहारच्या झांशी येथील एक धक्कादायक आणि आश्चर्यकारक घटना घडली. या घटनेनंतर पोलिसांच्या कारवाईवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. याचे कारण १७ वर्षांनी मृत जाहीर करण्यात आलेली व्यक्ती जिवंत असल्याचे आढळले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, त्याच्या हत्येच्या आरोपात चार जण जेलमध्येही गेली. यामध्ये त्याचा मामा आणि भावांचा समावेश आहे. मामाचा मृत्यू झाला असून, तिघे भाऊ सध्या जामिनावर बाहेर आहेत. झांशी पोलिसांना बिहार पोलिसांच्या रेकॉर्डनुसार मृत असलेली ही व्यक्ती जिवंत असल्याचे आढळल्यानंतर प्रकरण उजेडात आले.

६ जानेवारीला गस्त घालत असताना झांशी पोलिसांना एक व्यक्ती आढळली आणि संशय आला. यानंतर पोलिसांनी त्यांच्याकडे चौकशी केली. चौकशीदरम्यान ही व्यक्ती गेल्या सहा महिन्यांपासून गावात राहत असल्याचे समोर आले. त्याची ओळख नथुनी पाल अशी पटली. तसेच तो ५० वर्षांचा असून बिहारच्या देवरियाचा रहिवासी असल्याचे उघड झाले. अजून चौकशी करण्यात आली असता, तो एकटा राहत असून नुकताच झांशी येथे रहाण्यास आला असल्याचे समोर आले. त्याने पोलिसांना सांगितले, की मी लहान असताना माझ्या आई-वडिलांचा मृत्यू झाला. माझ्या पत्नीने कित्येक वर्षांपूर्वी मला सोडले आहे. माझ्या बिहारमधील घरी जाऊन मला आता १६ वर्षं झाली आहेत.

*** हत्येचा आरोप**

२००९ मध्ये नथुनी पाल आपल्या घरातून बेपत्ता झाले होते. नथुनी पालच्या एका मामाने दुसऱ्या मामाविरोधात आणि चौघा भावांविरोधात पोलीस ठाण्यात तक ार दाखल केली होती. त्यांनी जमीन हडपली आणि हत्या केली असा आरोपी त्यांनी केला. माझा मोठा भाऊ जो पोलिसात आहे त्याचेही नाव तक ारीत होते; पण त्याने अधिकाऱ्याकडे विनंती केल्यानंतर नाव एफआयआरमधून मागे घेण्यात आले होते, असे हत्येचा आरोप असणाऱ्या भावांपैकी एक असणाऱ्या सत्येंद्र पाल याने सांगितले. माझे वडील आणि दोन भावांनी जेलमध्ये आठ महिने घालवले. सध्या आम्ही जामिनावर बाहेर आहोत असेही त्याने सांगितले. नथुनी पाल जिवंत असल्याचे समजल्यानंतर सत्येंद्र पालला अश्रू अनावर झाले. आम्ही आता हत्येच्या आरोपातून मुक्त झाल्याची भावना त्याने व्यक्त केली आहे. दरम्यान, हे प्रकरण अद्याप न्यायालयात आहे. झांशी पोलिसांनी नथुनी पाल यांना बिहार पोलिसांकडे सोपवले आहे.


राजीनामापत्र म्हणजे कोणताही कर्मचारी स्वतःच्या इच्छेने कंपनी सोडतो तेव्हा देत असलेले पत्र. सहसा कर्मचाऱ्याला दुसऱ्या कंपनीत चांगला पर्याय सापडतो तेव्हा राजीनामा दिला जातो, पण काही वेळा काही लोक अशा कारणांसाठी राजीनामा देतात की लोकांना कळल्यावर हसू आवरत नाही. एकीकडे लोक कमी पगारामुळे राजीनामे देतात, तर दुसरीकडे नोकरीतून त्यांच्या आवडीच्या वस्तू विकत घेता येत नसल्याने अनेक लोक राजीनामा देत आहेत. अलीकडेच 'सोशल मीडिया'वर राजीनामा पत्राचा एक फोटो व्हायरल होत आहे, जो पाहिल्यानंतर तुम्हालाही डोके वर काढायला भाग पडेल. दि'तील एका व्यावसायिकाने आपल्या कर्मचाऱ्याचे राजीनामा पत्र 'सोशल मीडिया'वर शेअर केले होते. त्यात राजीनाम्याचे एक विचित्र कारण देण्यात आले होते, त्यानंतर हे राजीनामा पत्र काही वेळातच व्हायरल झाले.

**'या' कारणाने सोडली नोकरी**

अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी डिझाइन केलेल्या इंजिनियर हब या ऑनलाइन प्लॅटफॉर्मचे सह-संस्थापक ऋषभ सिंह यांनी एक्स वर एक पोस्ट शेअर केली आणि कर्मचाऱ्याने कंपनी सोडण्याचे कारण स्पष्ट केले. ते लोकांमध्ये चर्चेचे कारण बनले. राजीनामा पत्रात इतकी करमणूक आहे, की ते वाचून कुणीही हसायला लागेल. या कर्मचाऱ्याने प्रथम 'एचआर'कडे त्याच्या कमी पगाराची तक ार केली आणि सांगितले, की माझ्या अपेक्षेनुसार माझी पगारवाढ गोठवली गेली आहे. यानंतर कर्मचाऱ्याने त्याच्या 'एचआर'ला राजीनाम्याचे कारण सांगितले. त्यात कर्मचाऱ्याने त्याच्या सध्याच्या पगारात महागडा फोन खरेदी करू न शकल्याने नाराजी व्यक्त केली. फोन विकत घेऊ न शकल्याने कर्मचाऱ्याने कंपनी सोडली, हे एक विचित्र कारण आहे, आता 'सोशल मीडिया' वापरकर्ते यावर आपली मते देत आहेत.



## फोन विकत न घेता आल्याने राजीनामा!



## पर्यावरणाचे पाईक

अरुणाचल प्रदेशमधल्या लोअर सुबंसरी जिल्ह्यातल्या झीरो व्हॅलीमध्ये अनोख्या पद्धतीने शेती केली जाते. इथले लोक निसर्गाची खूप काळजी घेतात. शेती करण्यासाठी इथे पशू किंवा उपकरणांची मदत घेतली जात नाही तर इथल्या महिला सर्व कामं हातांनी करतात. विशेष म्हणजे इथे महिलाच कुटुंबप्रमुख असतात. झीरो व्हॅली समुद्रतळापासून ५,६०० फूट उंचीवर आहे. या परिसरात अपातिनी जमातीचे लोक रहातात. या समाजातल्या महिला शेतीची सर्व जबाबदारी सांभाळतात. या जमातीतले लोक पाण्याचा वापर जपून करतात. पाण्याच्या प्रत्येक थेंबाचं महत्त्व ते जाणतात. शेतांमधल्या छोट्या डबक्यांच्या देखभालीची जबाबदारी या भागातली प्रत्येक व्यक्ती घेते. वर्षातला एक दिवस प्रत्येकाने या डबक्यांच्या देखरेखीसाठी द्यायचा असतो. या डबक्यांमध्ये म त्स्यपालनही केलं जातं. इथे शेतीसाठी रासायनिक खतांचा वापर होत नाही. इथल्या घरांमधला ओला कचरा बाहेर टाकला जात नाही. त्यापासून खत तयार केलं जातं. या खोऱ्यात सप्टेंबरमध्ये संगीत महोत्सवाचं आयोजन केलं जातं. विविध प्रांतातले कलाकार यात सहभागी होतात. इथल्या शाळांमध्येही झीरो वेस्ट उपक्रम राबवला जातो. मुलांना याचे धडे दिले जातात. त्यामुळे अपानिती जमातीला पर्यावरणाचे पाईकच म्हणायला हवं.

# घराच्या छतावर ‘सौरयंत्र’ बसवून ३६० युनिटपर्यंत मोफत वीज मिळणार

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घ्यावा : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

नगर – घराच्या छतावर सौरयंत्र बसवून ३६० युनिटपर्यंत मोफत वीज मिळविण्यासाठी ‘प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजने’त ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येत आहे. रूफ टॉप सोलार वीजनिर्मिती प्रकल्पाद्वारे सौरऊर्जेचा वापर करून वीजनिर्मिती करायची व घरगुती वापरासाठी ती वीज वापरावी, अशी ही योजना आहे. गरजेपेक्षा अधिक वीजनिर्मिती झाल्यामुळे वीजबिल येत नाही. अहिल्यानगर शहरातील १२०० मालमत्ताधारकांनी या योजनेचा लाभ घेऊन ते हरीत ऊर्जा निर्माते झाले आहेत. त्यामुळे इतर मालमत्ताधारक नागरिकांनीही या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.



वीज ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणारी ‘प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना’ राज्यात लागू करण्यात आली याप्रसंगी आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांचा नागरिकांनी सत्कार केला.

वीज ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणारी ‘प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना’ राज्यात लागू करण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असून रूफ टॉप सोलार सिस्टिमसाठी केंद्र सरकार वीज ग्राहकाला एक किलोवॉटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॉटसाठी ६० हजार रुपये व तीन किलोवॉटसाठी ७८ हजार रुपये अनुदान देत आहे. वीज ग्राहकाला जास्तीत जास्त ७८ हजार रुपये अनुदान निश्चित करण्यात आले आहे. वीज ग्राहकांना सोलार सिस्टिम बसविण्यासाठी महावितरण सहाय्य करीत आहे. त्यासाठी ‘पीएम सूर्यघर’ या राष्ट्रीय पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी आवश्यक आहे. याच नावाचे मोबाईल ॲपही उपलब्ध आहे.

छतावरील १ किलोवॉट क्षमतेच्या सोलार सिस्टिममधून दररोज सुमारे चार युनिट अर्थात दरमहा सुमारे १२० युनिट वीज तयार होते. महिना दोनशे युनिटपर्यंत वीज वापर करणाऱ्या कुटुंबाला २ किलोवॉटपर्यंतच्या क्षमतेची सोलार सिस्टीम पुरेशी आहे. त्यातून दरमहा सुमारे २४० युनिट वीज निर्मिती होते. २५० ते ३५० युनिट वीज वापर असणाऱ्या कुटुंबासाठी ३ किलोवॉट क्षमतेची सिस्टीम पुरेशी ठरते. त्यातून दरमहा ३६० युनिट वीज निर्मिती होते. एकदा सोलर बसल्यानंतर २५ वर्षांपर्यंत वीजनिर्मिती होते. ‘प्रधानमंत्री सूर्यघर योजने’साठी अनुदान दिले जात आहे.

या योजनेमुळे नागरिकांना मोफत वीज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे अहिल्यानगर शहरातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

# अहिल्यानगर शहराला पूर्णवेळ सक्षम आरोग्य अधिकारी मिळावा

### ‘स्मायलिंग अस्मिता’ची मागणी

नगर – शहराला पूर्णवेळ सक्षम आरोग्य अधिकारी मिळावा या मागणीचे निवेदन स्मायलिंग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेच्या युवती आघाडीच्या वतीने अहमदनगर महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना प्रा. नंदा पांडूळे यांच्या हस्ते देण्यात आले.


शहराला पूर्णवेळ सक्षम आरोग्य अधिकारी मिळावा या मागणीचे निवेदन स्मायलिंग अस्मिताच्यावतीने महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना देण्यात आले.

त्यात म्हटले आहे की, गेल्या काही वर्षांत शहरातील आरोग्य यंत्रणा कोलमडली आहे, असे आम्ही अनुभवत आहोत. मध्यंतरी तर नागरिक साथीच्या आजारांनी ग्रस्त झाले होते. याला सर्वस्वी महापालिकेचे आरोग्य अधिकारीच जबाबदार आहेत. कारण कनिष्ठ कर्मचारी खूप मनापासून काम करतात, परंतु वरिष्ठांकडून कामाचे नियोजन नसल्या कारणाने सगळा बोजवारा उडत आहे. मधल्या काळात तर आम्ही वर्तमानपत्रात आरोग्य अधिकाऱ्यांवर विविध कारवाई झाल्याचे वाचले किंवा त्याआधी सुद्धा विविध आरोप त्यांच्यावर झालेले वर्तमानपत्रात वाचले. यामुळे आमच्या महापालिकेची आणि शहराची प्रतिमा मलिन होत आहे.

आपण अतिशय कार्यक्षम प्रशासक आहात असे आम्ही अनुभवले आहे. वर्तमानपत्रात देखील आम्ही आपले काम पाहत असतो. आपण थेट गटारीत उतरून कचरा उचलता, शहर स्वच्छतेचा विडा तुम्ही उचललेला आहे. आम्हाला आशा आहे की आपण आम्हाला खरोखर काम करणारा व नागरिकांशी सुसंवाद ठेवणारा आरोग्य अधिकारी पूर्णवेळ द्याल, अशी आम्ही आपणाकडे मागणी करतो.

आपण मागणी मान्य न केल्यास शिवजयंतीला महानगरपालिकेसमोर कल्पक पद्धतीने आंदोलन करू असा इशाराही प्रा. नंदा पांडूळे यांनी दिला. यावर उत्तर देताना आयुक्त म्हणाले की आम्ही सदैव नगरकरांच्या सेवेत आहोत. आंदोलनाची गरज भासणार नाही, लवकर सक्षम व्यक्ती त्या ठिकाणी नेमू, असे आश्वासन त्यांनी दिली.

यावेळी पुजा राठोड, निलक्रांती आडबले, लिना ठाकरे, भाग्यश्री नागरगोजे, प्रज्ञा घोरपडे, प्रतिक्षा उदमले, कृतिका बिटेवार, प्रिती शिरसाठ यांसही स्मायलिंग अस्मिताचे कार्याध्यक्ष यशवंत तोडमल, धिरज कुमटकर उपस्थित होते.



## भिंगार येथील विष्णू घुले यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

भिंगार येथील माजी कॅन्टोन्मेंट बोर्ड सदस्य तथा शिवसेनेचे माजी शहर प्रमुख विष्णू घुले यांनी शिवसेना शिंदे गटाचे सचिव भाऊ चौधरी यांच्या हस्ते शिवसेनेत प्रवेश केला. याप्रसंगी उपस्थित जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, संपर्कप्रमुख दिलीप सातपुते, शहर प्रमुख सचिन जाधव, युवा सेना जिल्हाप्रमुख आकाश कातोरे, युवा सेना जिल्हाप्रमुख योगेश गलांडे, नगर तालुका प्रमुख अजित दळवी, माजी नगरसेवक संजय छजलानी, रवींद्र लालबोंद्रे आदी.

# कुष्ठधाम रोडवरील मटका अड्ड्यावर छापा

नगर– शहरातील कुष्ठधाम रोडवरील जगदंबा हॉटेल जवळील एका बंद टपरीच्या आडोशाला बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या कल्याण मटका जुगार अड्ड्यावर तोफखाना पोलिसांनी छापा टाकून एकास ताब्यात घेतले. ही कारवाई नगर २८ जानेवारी रोजी सायंकाळी केली.

कृष्ठधाम रोडवरील जगदंबा हॉटेलजवळ असलेल्या टपरीमध्ये मटका खेळला जात होता. पोलिसांनी तेथे छापा टाकला त्यावेळी मटका खेळणारे काही जण पळून गेले. तेथे मटका घेणारा राजु बाजीराव पठारे (वय ५०, रा. तोफखाना) याला पकडण्यात आले. त्याच्या विरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

# ‘धर्मनिरपेक्ष राष्ट्र’ या ‘संविधानाच्या’ तत्वानेच सामाजिक व आर्थिक समता निर्माण होऊ शकते

### अशोक सब्बन यांचे प्रतिपादन

नगर – शासनाचा अधिकृत असा कोणताच धर्म असणार नाही शासकीय धोरणे व कामकाज चालवताना कोणत्या धर्माच्या आज्ञा प्रमाण मानावयाचा नाही तर संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या तत्त्वानुसार राज्यकारभार करणे. सर्व धर्मांचा आदर राखून प्रत्येकाला आपल्या श्रद्धा व उपासना आपल्या पद्धती नुसार आचरण करण्याचा हक्क संविधानाने दिला असून आपल्या आचरणाने दुसऱ्या व्यक्तिच्या स्वातंत्र्याचा संकोच होऊ नये व धोका पोहोचू देऊ नये अशी भूमिका धर्मनिरपेक्ष या तत्त्वाची संविधानाने अपेक्षा केलेली आहे, असे प्रतिपादन व्याख्यानमालेतील प्रमुख वक्ते म्हणून बोलताना अशोक सब्बन यांनी केले.


अरिहंत फार्मसी महाविद्यालय सोनेवाडी येथे युवकांना संविधान व धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही या विषयावर व्याख्यान देताना अशोक सब्बन.

### लोकशाही उत्सव २०२५ अहिल्यानगर

लोकशाही उत्सव २०२५ अहिल्यानगर या अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील युवकांसाठी संविधान व धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही या विषयावर व्याख्यानांचे आयोजित करण्यात आले. यातील पहिले पुष्प अरिहंत फार्मसी महाविद्यालय सोनेवाडी अहिल्यानगर येथे गुंफण्यात आले.

या अभियानाच्या भूमिकेचे महत्त्व विशद अभियानाचे अध्यक्ष डॉ. प्रशांत शिंदे करून लोकशाही उत्सवात सहभागी होत असलेल्या युवकांनी संविधानाच्या सर्व भूमिका समजावून घेणे अपेक्षित आहे. आम जनते साठी देशाचा पारदर्शक कारभार आणि विशेषतः सामाजिक व आर्थिक समता निर्माण करण्यासाठी संविधानाच्या तत्वाच्या आधारे कसे करता येईल, यासाठी युवकांचे योगदान कसे असावे या संदर्भात या अभियानाची भूमिका स्पष्ट केली. यात युवकांनी सक्रिय सहभागी व्हावे असे आवाहनही डॉ. प्रशांत शिंदे यांनी केले.

या प्रसंगी अरिहंत फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर योगेश बाफना यांनी प्रस्तावना करून स्वागत केले. उपप्राचार्य वर्षा आव्हाड यांनी सूत्रसंचालन केले. प्राध्यापक स्वप्निल काळे यांनी आभार मानले. यासाठी कॉलेजच्या युवकांनी सहभाग नोंदवून प्रतिसाद दिला.

# युवकांनी रक्तदान चळवळीत मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे

## डॉक्टर अशपाक पटेल यांचे प्रतिपादन; अल-करम हॉस्पिटलच्या शिबीरात ५३ जणांचे रक्तदान

नगर – रक्त हे कोणत्याही फॅक्टरीत तयार होत नसल्याने त्याची गरज भासल्यास मनुष्यालाच रक्तदान करावे लागते. एखाद्या रुग्णाला रक्ताची आवश्यकता भासल्यास त्यास ते वेळेत मिळणे गरजेचे असते. यासाठी युवकांनी रक्तदान करुन या चळवळीत सहभागी झाले पाहिजे. अत्याधुनिक उपचार पद्धतीने रक्ताचे विघटन होत असल्याने एका रक्तदात्याचा अनेकांना फायदा होत असल्याने या पुण्यकार्यात सहभागी व्हावे. अल-करम संस्थेच्यावतीने राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे इतरांनाही प्रेरणा मिळणार आहे, अशा उपक्रमाची समाजाला गरज आहे, असे प्रतिपादन डायबेटोलॉजिस्ट अँड कार्डिओलॉजिस्ट डॉ. अशपाक पटेल यांनी केले.


अल-करम हॉस्पिटलच्या शिबीरात ५३ जणांनी रक्तदान केले.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून चांदबीबी महल व अलकरम हॉस्पिटलमध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशपाक पटेल, डॉ. जहीर मुजावर, डॉ. नजमा जहीर, डॉ. विश्वजीत पवार, अर्शद सैय्यद, एजाज तांबोली, समीर सैय्यद, शेरअली शेख, इंजि. उसामा शेख, इमरान भाईजान, तौफिक तांबोली आदि उपस्थित होते.

डॉ.जहीर मुजावर म्हणाले, आज प्रत्येकाचे जीवनमान धावपळीचे झाले आहे, त्यामुळे रस्ते अपघाताबरोबरच इतरही अनेक कारणांनी रक्ताची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर भासत असते. अशा परिस्थितीत प्रत्येकाने कर्तव्य म्हणून वर्षभरातून एकदातरी रक्तदान करुन आपले सामाजिक दायित्व पार पाडले पाहिजे. आपणही समाजाचे काही देणे लागतो, या भावनेतून रक्तदान करणे जरुरी आहे, असेही त्यांनी सांगितले.

रक्तसंकलनचे कार्य साई सेवा ब्लड सेंटर, ब्लड कंम्पोनंट अँड अफेरेसिस सेंटर अहमदनगर व अर्पण ब्लड बँकच्या भाग्यश्री मॅडम, किशन कराळे, प्रेम इंगळे, जमुना उगले, दुर्गा गरड आदींनी केले. या शिबीरात ५३ रक्त पिशव्यांचे रक्तसंकलन करण्यात आले. या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना शेरअली शेख म्हणाले की अलकरम सोसायटीच्या माध्यमातून आरोग्याच्या क्षेत्रात वर्षभर समाज उपयोगी उपक्रम सतत राबविले जात असते. म्हणून या उपक्रमामध्ये समाजातील लोकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे असे सांगितले.

सूत्रसंचालन तौफिक तांबोली यांनी केले तर आभार समीर सय्यद यांनी मानले.


चंद्रपूर येथील आपला चहा या नवीन दालनाचे उद्घाटन करण्यात आले.

# नोकरीच्या मागे न लागता व्यवसाय करा

## श्रीनिवास बोज्ञा यांचे आवाहन; आपला चहा या नवीन दालनाचे उद्घाटन

नगर – सध्याच्या स्पर्धेच्या युगात सरकारी नोकरी मिळणे अवघड आहे त्यासाठी मोठ्या प्रमाणात कष्ट करावे लागते तरी सुद्धा यश मिळेलच असे नाही, त्यामुळे नोकरी मागे न लागता व्यवसाय करा, असे आवाहन श्रीनिवास बोज्ञा यांनी केले.

कोहिनुर मॉल समोर, नगर-मनमाड रोड येथे चंद्रपूर येथील आपला चहाचे दालनाचे उद्घाटन श्रीनिवास बोज्ञा व माजी नगरसेविका सौ. वीणा बोज्ञा यांचे हस्ते झाले. यावेळी संचालक सोनल डेंगळे, नगर शॉपचे संचालक मनोज चव्हाण, सौ. निशा चव्हाण, सहजयोगी राहुल सातपुते, वाय प्रकाश टेलर उपस्थित होते.

यावेळी सोनल डेंगळे यांनी माझा ब्रँड नागपूरमध्ये असून मी आतापर्यंत २६ शाखा उघडल्या आहेत. पहिल्यांदाच विदर्भमधून पश्चिम महाराष्ट्रमध्ये पहिलीच शाखा उघडली असून नक्कीच आपला चहा नगरकर पसंती देतील असा विश्वास दिला.

यावेळी सौ. वीणा बोज्ञा यांनी चव्हाण यांना शुभेच्छा दिले. शेवटी मनोज चव्हाण यांनी आभार मानले.

# सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटचा १००% निकाल

## सचिन थावरे प्रथम, दिलीप गोरे द्वितीय, आदित्य गाडेकर व गौरव थावरे तृतीय क्रमांक






नगर – सिद्धी इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल सायन्स अँड टेक्नॉलॉजी, श्रीरामपूर येथे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई अंतर्गत ॲडव्हान्स डिप्लोमा इन एक्स-रे रेडीओग्राफी टेक्निक्स (RZ) या कोर्स च्या प्रथम सत्राचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे.

यामध्ये सचिन थावरे (७१.६०%) याने प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक दिलीप गोरे (६६.२०%) याने आणि आदित्य गाडेकर (६५.४०%) व गौरव थावरे (६५.४०%) या विद्यार्थ्यांनी संयुक्तपणे तृतीय क्रमांक पटकावला आहे.

ॲडव्हान्स डिप्लोमा इन एक्स-रे रेडीओग्राफी टेक्निक्स हा कोर्स दीडच वर्षाचा असून याद्वारे अनेक नोकरी व व्यवसायाच्या संधी उपलब्ध होत आहेत, तसेच सरकारी नोकरीसाठी सुद्धा उपयुक्त असा कोर्स आहे, त्यामुळे विद्यार्थी नक्कीच करिअरच्या दृष्टीने सबळ होवू शकतो असा विश्वास आहे, असे मत डॉ. तृप्ती रांका यांनी मांडले. सदर विद्यार्थ्यांना सौ. सारिका घोडके, महेश जोशी आदींचे मार्गदर्शन लाभले.

डॉ. हरीष लुंकड यांनी सिद्धी इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यातर्फे सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## १ फेब्रुवारीपासून महिलांसाठी विनामूल्य ‘योगा क्लास’

नगर – आनंदऋषी बँड ब्लड बँकेत अनिल मेहेर यांच्या प्रेरणने विनामूल्य योगा क्लास १ फेब्रुवारी पासून दुपारी ४ ते ५ या वेळेत सुरू करण्यात येत आहे. सर्व महिलांना याचा फायदा घ्यावा. यात योगाचे सर्व प्रकारचे प्रशिक्षण दिले जाईल. प्राणायाम व आहाराचे पण मार्गदर्शन दिले जाईल. आरोग्य आपणासही आपले शरीर तंदुरुस्त आणि चपळ ठेवायचे असेल तर आज या योग संस्थेत दाखल व्हा. आजच प्रवेश घ्या. मो. ७९७२९६८७९१.

# भोयरे पठारच्या भाग्योदय विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा

### गुणवंत विद्यार्थ्यांना गौरव; सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी घडविले भारतीय संस्कृतीचे दर्शन

नगर – भोयरे पठार (ता. नगर) येथील भाग्योदय विद्यालयात ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील शैक्षणिक, कला, क्रीडा व स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. तर शाळेत रंगलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी विविधतेने नटलेल्या भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले.


भोयरे पठारच्या भाग्योदय विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा झाला याप्रसंगी उपस्थित असलेले शिक्षक.

प्रारंभी भारतीय सैन्य दलातील पवन मुठे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. देवराम कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे संचालक राजेंद्र शेळके, गणेश सातपुते, भोयरे पठारचे सरपंच बाबा टकले, भोयरे खुर्दचे सरपंच राजू आंबेकर, सर्व ग्रामपंचायत सदस्य, कवडेश्वर सैनिक संघटनेचे सर्व पदाधिकारी, राजेश बोरकर, गणेश मुठे, रवी आंबेकर, अमोल टकले, सुनील मोठे आदींसह ग्रामस्थ, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात विद्यालयाचे मुख्याध्यापक हबीब शेख यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना बदलत्या शैक्षणिक प्रवाहाबरोबर अद्यावत ज्ञान देण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमाची माहिती दिली. तर शाळेच्या वाढत्या गुणवत्तेचा आढावा त्यांनी घेतला. नगर तालुका गणित-विज्ञान प्रदर्शनामध्ये सत्यम संपत उरमुडे याने प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरावर त्याची निवड झाल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. रंगलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीवर व भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या गीतांचे सादरीकरण केले. पालक व ग्रामस्थांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना दाद दिली. सचिन मुठे व पवन मुठे यांच्यातर्फे मुलांना जेवणाचे डबे व शिक्षकांना वार्षिक डायरी भेट दिली. ग्रामस्थांच्यावतीने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

# ‘मोबाईल शॉप ऑन ई-व्हेईकल’साठी अर्ज करण्याचे आवाहन

नगर – दिव्यांगांना स्वावलंबी करण्याच्यादृष्टीने हरित उर्जेवर चालणाऱ्या फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल शॉप ऑन ई-व्हीईकल) मोफत उपलब्ध करुन देण्याच्या योजनेस शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेच्या लाभासाठी जिल्ह्यातील अधिकाधिक दिव्यांगांनी ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत https://register.mshdfc.co.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळाच्या व्यवस्थापकांनी केले आहे.

दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध करुन रोजगार निर्मितीस चालना देणे, दिव्यांग व्यक्तींचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन व्हावे तसेच सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे दिव्यांगांना त्यांच्या कुटुंबासमवेत जगण्यास सक्षम करण्याच्यादृष्टीने ही योजना राबविण्यात येत आहे.

